म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. नं.



REFBK-0005766

कवि
बा. भ. बोरकर



बा. भ. बोरकर

भारत-गौरव-ग्रंथमाला, पुष्प १३२ वें

# जीवन-संगीत



नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।

—भगवान् श्रीकृष्ण

REFBK-0005766

बा. भ. बोरकर

किंमत सवा रुपया

प्रकाशक :
**मंगेश नारायण कुळकर्णी,**
मालक,
**भारत-गौरव-ग्रंथमाला**
कर्नाटक हाऊस, चिरावाजार, मुंबई नं. २.

[ सर्व हक्क स्वाधीन ]

मुद्रक :
**मंगेश नारायण कुळकर्णी,**
कर्नाटक प्रेस,
कर्नाटक हाऊस, चिरावाजार, मुंबई नं. २.

कविवर्य भास्करराव तांबे

यांस—

# दोन गद्य शब्द

—*-*—

लहानपणीं मोठ्या समारंभांतहि धिटाईनें तानबाजी करूं शकणारा मुलगा मोठे-पणीं मैफलींतलें गाणें करण्याचें भाग्य लाभल्यावर ऐनप्रसंगीं बावरून गेलेला दिसत नाहीं का? जी मंडळी त्याचे दोष पोटांत घालून गुणांचेंच कौतुक करीत आली, तीच समोर दिसत असतांनाहि त्याला आपलें मन शांत ठेवतां येत नाहीं. या मन:स्थितीच्या मुळाशीं रसिकांच्या वाढत्या अपेक्षांची जाणीव हें एक कारण असतेंच. पण ज्या गायकीचें नांव सांगून त्याला गावयाचें असतें, तिच्या थोरवीची जाणीव हें त्याहूनहि जास्त सबल कारण असतें.

महाराष्ट्र-शारदेच्या दरबारांत माझें हें '**जीवन-संगीत**' आळवतांना माझी स्थिति त्या मुलासारखीच झाली आहे. मी '**प्रतिभा**' या माझ्या कवितासंग्रहाकडे किशोरा-वस्थेंतली तानबाजी म्हणूनच पहातों. त्याला गाणें म्हणतां येणार नाहीं. रसिकांनीं त्याकडे कौतुकानें पाहिलें, त्यामुळें मीहि वाढत्या उत्साहानें अभ्यासाला लागलों. कविवर्य तांब्यांच्या घराण्याची गायकी पुढें चालविण्याच्या निष्ठेनें मी कलेच्या उपासनेला लागलों व बराचसा आत्मविश्वास आल्यावर महाराष्ट्राच्या रसिकतेला रिझविण्याच्या महत्त्वाकांक्षेनें माझें '**जीवन-संगीत**' आळवावयाला सिद्ध झालों. पण आपल्या वाढत्या अपेक्षा व तांब्यांच्या गायकीची थोरवी यांची योग्य जाणीव असल्यामुळें मला या क्षणीं महत्वाकांक्षेएवढीच भीतीहि पण वाटत आहे. तयारी केवढीहि असली तरी आपला ताल चुकेल का, अशी भीति नवख्या गवयाला असतेच. तशी ती मलाहि आहे. पण सांभाळून घ्यावयाला भाऊसाहेब खांडेकरांसारखे दर्दी वस्तादजी पाठीशीं आहेत हें जाणून मात्र मला तितकाच धीरहि वाटतो. त्यांच्या गोड हातांतून निघणाऱ्या मधुर बोलांची साथ असल्यावर गाण्याच्या यशस्वितेबद्दल कुणाला शंका राहील? ज्यांनीं आपल्या बहुविध मधुर बोलांनीं माझ्या जीवनाला ताल दिला त्यांनींच माझ्या संगीतालाहि साथ द्यावी हें मी माझें भाग्य समजतों. अशा साथीला सुदैवानें रसिक

व चतुर टीकाकारांच्या तरल अनुभूतीच्या सारंगीची जोड मिळाली, तर मला मोठा आनंद होईल. ती न मिळाली तर सामान्य रसिकतेचा तंबोराहि मला पुरेसा वाटेल. पण महाराष्ट्रांत तंबोऱ्याला गवसणी पडून बाजाच्या पेट्यांचाच सुकाळ झाला आहे, हा प्रवाद मात्र मला अस्वस्थ करतो. तो खरा असेल का ?

आज हें 'जीवन-संगीत' आळवितांना अनेक व्यक्ति, प्रसंग, घटना व दृश्यें यांचा प्रकाश आणि परिमल यांनीं मला भोंवतालचें वातावरण धुंद वाटतें. अशीच प्रतीति रसिकांनाहि झाली. दैनंदिन व्यावहारिक जीवनापेक्षां जास्त सत्य, सुंदर व मंगल असें जीवन कांहीं क्षण जरी आपणांस अनुभवितां आलें आणि तांब्यांच्या अभिजात गायकीचा लौकिक व प्रसार वाढला तर हें 'जीवन-संगीत' सार्थकीं लागलें असें मी समजेन.

शेवटीं, ज्यांनीं हा योग तोशीस सोसून उत्साहानें व औदार्यानें घडवून आणला व आपली सेवा करण्याची मला सुसंधि दिली त्या मंगेशरावजींचे मी मनःपूर्वक आभार मानतों.

रसिकांचा नम्र,

**बा. भ. बोरकर**

# साथ*

अलीकडे मराठींतल्या कवित्वाला ओहटी लागली आहे अशी अनेक तज्ज्ञ हाकाटी करीत आहेत ! ती ऐकून 'लांडगा आला रे आला' या गोष्टीची आठवण मात्र होते ! जुन्या काळचे पंडित घटपटादि खटपट करून तत्त्वज्ञानाची चर्चा केल्याचें श्रेय घेत असत. तशापैकीं केवळ वेळ घालविणारा मनोविनोदनाचा वाद करावयाचा असल्यास 'काव्याला ओहटी लागली आहे काय ?' या प्रश्नापेक्षांहि 'दिवसेंदिवस माणसें अधिक ठेंगू होत आहेत काय ?' अशासारखा—किंबहुना 'पुरुषांना पूर्वीपेक्षां कमी मिशा येत आहेत काय ?' असाहि विषय चर्चेला घ्यावयाला हरकत नाहीं. राजदरबारांतहि आपल्या तोंडाला कुलूप घालण्याची सक्ति विदूषकावर कधींच होत नसे. पण वाङ्मयविषयक मूलगामी चर्चा या दृष्टीनें हा प्रश्न विद्वान लोक हाताळीत असल्यास त्यांनीं किनाऱ्यापासून दूर उभें राहून काव्याची भरतीओहटी ठरविण्याचा प्रयत्न करणें फारसें इष्ट होणार नाहीं ! त्याकरितां पाण्यांत—प्रसंगीं खोल पाण्यांतहि शिरावयाला तयार झालें पाहिजे.

फौजदारी कोर्टांत नित्य नियमानें जाऊन खटले ऐकत बसणाऱ्या मनुष्याला जगांतली नीतिमत्ता फार खालावलेली आहे असें वाटणें स्वाभाविक आहे. अशांतलाच हा काव्याच्या ओहटीचा आरडाओरडा वाटतो. एक गोविंदाग्रजांचा काल आठवून दुःखाचा सुस्कारा सोडतो, दुसरा चक्रवाढ व्याजानें काव्याची पैदास होत असूनहि त्याचें भांडवल संपुष्टांत येत आहे असा हिशेब करून हळहळतो, तर तिसरा आतां पद्यरचनेची जगांत जरूरीच उरली नाहीं अशी ग्वाही देतो ! 'त्रयाणां धूर्तानाम्' या गोष्टीसारखी येथें कांहीं बोकडाची गडबड नाहीं म्हणून बरें ! नाहींतर हे सर्व विद्वान सिद्धसाधक आहेत असाच उदयोन्मुख कवींचा तरी समज व्हावयाचा !

---

* या साथींत भीतिदायक असें कांहीं नाहीं.

केशवसुत–गोविंदाग्रजांचाच नव्हे, तर रविकिरणमंडळाच्या उत्कर्षाचा काळ हा मराठी कवितेच्या दृष्टीनें कुतूहलाचा व मराठी जीवनाच्या दृष्टीनें काव्यरम्यतेचा होता. काव्यरचनेचे अनुकरणात्मक नवे नवे प्रकार आणि काव्याला वाहून घेतलेल्या कवींच्या विविध प्रतिभा यांच्या जोडीला कल्पना–विलासांत गुंगून जाणारें सामाजिक मनहि त्यावेळीं होतें. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' हें ठांसून म्हणणें हें तेव्हां राजकीय आकांक्षांचें उच्च शिखर होतें; आणि प्रेम, वैधव्य, अस्पृश्यता, दारिद्र्य इत्यादि विषयांकडे सुखासीन सहानुभूतीनें पाहणें हा तर सामाजिक सुधारणेचा फार मोठा पल्ला वाटे! कवींच्या दुर्दैवानें पण समाजाच्या सुदैवानें गेल्या कांहीं वर्षांत ही परिस्थिति झपाट्यानें वदलूं लागली आहे. प्रीतीला पदोपदीं दारिद्र्याचें अग्निदिव्य करावें लागत आहे, तर पुनर्विवाहेच्छु विधवा भावी पतींना आपण किती हजारांचा विमा उतरला आहे असा रोखठोक प्रश्न करीत आहेत. 'अस्पृश्याला काय डोळे नाहींत, कीं हात नाहींत, कीं हृदय नाहीं?' या नाटकी वक्तृत्वाला 'तें सर्व तर आहेच, पण आम्हांला बुद्धीहि आहे' अशीं उत्तरें श्रोत्यांकडूनच मिळत आहेत. धरणीकंपालाहि कांपरें सुटेल असे भयंकर धक्के दारिद्र्य देत आहे आणि पिढ्यान्‌पिढ्या डौलानें आकाशाकडे पाहणारीं सनातनी संस्कारांचीं मंदिरें धडाधड कोसळून पडत आहेत. मागच्या पिढीला–कृत्रिम कां होईना–पण काव्यानुकूल परिस्थिति होती. झोंप स्वाभाविकपणें येवो अथवा औषधानें येवो, ती आली तरच स्वप्नें पडण्याचा संभव! सध्यांची तरुण पिढीहि काव्यात्मक आहे. पण तारवटलेल्या डोळ्यांनीं सभोंवार पसर-लेल्या गडद अंधकाराकडे पाहण्याची पाळी आल्यामुळें तिचा डोळ्याला डोळा लागत नाहीं. तिला पुढेंहि जातां येत नाहीं आणि आजूबाजूला कोठें निवाऱ्याची जागा शोधून घटकाभर डोळे मिटून निवांतपणें पडतांहि येत नाहीं. मराठी काव्याला ओहटी लागली आहे असें जें वाह्यतः दिसतें, त्याचें मुख्य कारण ही प्रतिकूल परिस्थिति आहे.

वाह्यतः असें मी मुद्दामच म्हणतों. समुद्राचें विशालत्व ओहटीमुळें कमी होत नाहीं अगर ओहटी लागली म्हणून त्यांत मोत्यें निर्माण झाल्याशिवाय राहत नाहींत. पण ही दिसणारी ओहटीहि खरी नसून तो सुकतीचा नुसता भास आहे. लघुकथा, लघुनिबंध, कादंबरी, बोलपटकथा इत्यादि अर्थपूर्ण कटाक्षांनीं गद्यानें प्रतिभावंत

लेखक आपल्या जाळ्यांत ओढून घेतल्यावर पद्यप्रदेशांतलीं पिकें सोळा आणे येत नाहींत यांत नवल कसलें ? सावरकर, अत्रे, फडके, माडखोलकर यांच्या गद्यांत काव्य नाहीं असें कोण म्हणेल ? पण काव्यरचनेला जी संगीतसमाधि लागते ती विमानाच्या वेगानें विविध साहित्यप्रांतांत संचार करणाऱ्या या लेखकांना कशी साधणार ? केशवसुत, तांबे, टिळक, चंद्रशेखर, बी इत्यादि कवि कवितेशीं एकनिष्ठ राहिले—परिस्थितीमुळें राहूं शकले असें म्हणावें हवेंतर ! आजच्या पिढींत ती एकनिष्ठता शक्य नाहीं. 'पिपासितैर्काव्यरसो न पीयते' हें कवीच्या बावतींतहि खरेंच आहे ! अनंत काणेकर, के. नारायण काळे, तळवलकर यांच्या कविता काय वाचनीय नव्हत्या ? त्यांची प्रतिभा झोंपीं गेली आहे असें म्हणण्यांत कांहींच अर्थ नाहीं. ती लघुनिबंध, बोलपट, कादंबरी या क्षेत्रांत चमकत आहेच. फार तर तिनें काव्याशीं काडीमोड केली आहे असें म्हणावें. या काडीमोडीच्या मुळाशींहि स्वभावांतल्या विसंगतीपेक्षां परिस्थितीचें प्रावल्यच अधिक आहे असें दिसून येईल. इतर वाङ्मयक्षेत्रांत प्रवेश केल्यानंतर तेथें नवीं नवीं तंत्रें आत्मसात् करावीं लागतात. अनेक क्षेत्रांत अनिरुद्ध संचार करणें एखाद्यालाच व तेंहि क्वचितच साधतें. त्यांतून इतर वाङ्मयक्षेत्रांतला व्याप कवितेच्या गुंजनाला न मानवणाराच असतो. नाटकांकडे पूर्णपणें वळल्यावर गडकऱ्यांची काव्यनिर्मिति जवळ जवळ नाहींशीच झाली नाहीं का ?

या पिढीच्या उदयोन्मुख कवींचे हाल तर पहायलाच नकोत ! कोणाला दिवसाचे बारा तास छापखान्यांत जाहिरातींचीं व जमाखर्चाचीं मुद्रितें तपाशीत काढावे लागतात, तर कोणाला काव्यरसापेक्षां कालव्याचें पाणी शेतांत बरोबर जात आहे कीं नाहीं हें पाहण्यांतच वेळ काढावा लागतो. त्यांलहि गद्यलेखन कीर्ति, द्रव्य, इत्यादि आमिषें घेऊन प्रत्येकाच्या दाराशीं उभें आहेच ! प्रोत्साहनाकडे पहावें, तर सर्व छोटे मोठे लोक विडंबनाचे कुसिरडे कवीच्या फाटक्या सदऱ्यांत लपवून ठेवायला एका पायावर तयार ! पूर्वी कॉलेजच्या मासिकांत आलेल्या चांगल्या कवितेचें जेवढें कौतुक होत असे, तेवढें इतर ललितवाङ्मयाच्या वैपुल्यामुळें आज चांगल्या मासिकांत आलेल्या उत्कृष्ट कवितेचेंहि होत नाहीं. सामान्य काव्यसंग्रहांचेंहि त्या कुतूहलाच्या काळांत किती स्वागत होत असे ! पण आधुनिक मराठी कवितेला भूषणभूत होणाऱ्या

' हिरवें तळकोंकण ' अगर ' गोखलखां ' या कविता लिहिणाऱ्या माधवांचा संग्रह दोन वर्षांपूर्वी प्रसिद्ध होऊन गेला याचा कित्येकांना पत्ताहि नाहीं. जेथें तोफांची सलामी मिळे, तेथें साधे आपटबारहि दुर्मिळ झाले आहेत ! बाजारभाव उतरला कीं त्या पदार्थाची पैदास करण्याकडे निर्मात्याचा कल होत नाहीं, हा सिद्धांत या अर्थयुगांत कवितेलाहि थोडाफार लागू पडणारच !

अशा स्थितींतहि गेल्या चार पांच वर्षांत कारे, कांळेले, ना. घ. देशपांडे, कांत, कुसुमाग्रज, बोरकर, ठोकळ इत्यादि तरुण कवींच्या ज्या कविता वाचावयाला मिळाल्या त्या सर्व काय आपण सहजासहजीं विसरून गेलों आहों ?

निःस्तब्ध रहा क्षणिं या प्रणया ।
मौनांत बोलुं दे निजहृदया ॥
मौन न हें संगीत–परिणति । हृदयकलशिं हो स्वरजलभरती ।
उसव न आतां उद्गारांप्रति । स्वरकंप नसनसिं अनुभवुं या ॥

हें कवि श्री. कारे यांचें मधुर गीत गोविंदाग्रजांनीं ऐकलें असतें, तर ' गारे गारे गाच जरा ' असेच उद्गार त्यांच्या तोंडून बाहेर पडले असते. ना. घ. देशपांडे यांची ' नदीकिनारीं ', कांतांची ' गुन्हेगार ', कुसुमाग्रजांची ' स्वप्नाची समाप्ति ', या कविता कुठल्याहि काव्यसंग्रहाचें सौंदर्य वृद्धिंगत करतील इतक्या सरस आहेत. आतां असल्या कविता फार थोड्या निर्माण होतात असा आक्षेप घेणारांनीं केशवसुत, टिळक, गोविंदाग्रज, बालकवि, इत्यादिकांच्या कितीशा कविता काळाच्या कसोटीला टिकून राहिल्या आहेत व राहतील याचा रसिक दृष्टीनें अवश्य विचार करावा. वर उल्लेखिलेल्या तरुण कवींपैकीं फक्त कारे व काळेले यांचे संग्रह प्रसिद्ध झाले असून आज बोरकर आपलें **' जीवन संगीत '** घेऊन रसिकांच्या भेटीला येत आहेत. हे तीनच संग्रह पूर्वग्रह-विरहित दृष्टीनें वाचणाऱ्या रसिकाला, दंवबिंदु होण्याकरितां धांवणाऱ्या बाष्पाला मधल्यामधेंच लोपवून टाकणाऱ्या सध्यांच्या उष्ण वातावरणांतहि, केशवसुत, गोविंदाग्रज, बालकवि, तांबे, यशवंत आणि चंद्रशेखर, बी, रेंदाळकर, माधव, माधव ज्यूलियन या दोन्ही परंपरा यशस्वी रीतीनें चालविण्याचें सामर्थ्य या उदित महाराष्ट्रीय कवींत आहे असें दिसून आल्याशिवाय राहाणार नाहीं.

जीवन-संगीतांतली पहिली कविता '**कविवर भास्करास**—' ही वाचून बोरकर एक अनुकरणप्रिय कवि आहेत असा कित्येकांचा समज होण्याचा संभव आहे. तांब्यांच्या विषयींचा आपला निरतिशय आदर व्यक्त करण्याकरितां बोरकरांनीं ही कविता त्यांच्याच पद्धतीनें लिहिली असून भास्कर शब्दावरील श्लेष व पुढील चतुर मांडणी यांच्यामुळें ती तांब्यांच्याप्रमाणें सूर्याचीहि स्तुति होऊं शकते. आधुनिक महाराष्ट्रीय कवींत तांबे हे बोरकरांना अत्यंत आवडतात. आपल्या आवडत्या लेखकाची छाप कळत नकळत प्रत्येक उदयोन्मुख लेखकावर पडत असते. बोरकरांच्या कवितांतूनहि अशीं उदाहरणें शोधावयाला बसलें तर कांहीं मिळतीलहि. 'प्रमादाचा पिंगा' ही कविता तांब्यांच्या 'रुद्रास आवाहन' या कवितेवरून अगर 'सायुज्यमुक्ति' ही 'नववधू'-वरून सुचली असेल असें वाङ्मयांतल्या एकाद्या गुप्तपोलिसाला वाटण्याचा संभव आहे. परंतु सदरहू पोलीसबहाद्दुराविषयीं कोणताहि अनादर न दर्शवितां मी त्याला दुसऱ्या अधिक चांगल्या उद्योगाला लागण्याची सूचना करीन. बोरकरांची बहुतेक कविता इतकी आत्मस्फूर्त व वैशिष्ट्यपूर्ण आहे कीं असल्या दहा-पांच साम्यस्थळांनीं तिला कांहींच वैगुण्य येत नाहीं. तांब्यांच्या काव्यमोहिनीचें रूप त्यांच्या मनःश्चक्षूंनीं डोळे भरून पाहिलें आहे यांत शंका नाहीं. गेयता, कोमलता, लालित्य, माधुर्य, तत्त्वज्ञानाच्या संगमरवरी दगडांतून काव्याची सुंदर मूर्ति निर्माण करण्याची हौस, इत्यादि तांब्यांच्या कवितेचे विशेष या संग्रहांतहि वाचकांना आढळतील. पण या विशेषांत तांब्यांचें आंधळें अनुकरण नाहीं. येथें निर्जीव नक्कल नाहीं, तर अनुभूतीनें रसरसलेला अस्सलपणा आहे. ध्रुवाचा तारा नौकेला दिशा दाखवितो, पण समुद्रांतला प्रवास तिचा तिलाच करावयाचा असतो. पूर्वसूरींचे संस्कारहि असेच असत नाहींत काय ? शिवाय अनुकरण ही आत्महत्या केव्हां होते ? तें अंध असेल तेव्हां ! डोळस अनुकरण हा आत्मविकासाचाच एक भाग आहे. लहानपणीं मूल काय कमी अनुकरण करतें ? पण तेवढ्यानें पुढें त्याच्या व्यक्तित्वाचा विकास होत नाहीं असें थोडेंच आहे ! आणखीहि एक गोष्ट लक्षांत ठेवावयाला हवी. बुद्ध–ख्रिस्तानंतर गांधीजी जन्माला आले म्हणून कांहीं त्यांचा अहिंसावाद केवळ अनुकरणात्मक ठरत नाहीं !

बोरकरांच्या कवितांतून त्यांचें गोमन्तकीय वैशिष्ट्य पदोपदीं ओसंडत आहे.

‘इतुक्या लवकर येइं न मरणा’, ‘सांजवेळ’, ‘वारुणी रात’, ‘सागरा’ इत्यादि कवितांपैकीं कुठलीहि पहावी, ते आपल्या मातृभूमीच्या–भूमीच्याच नव्हे तर त्या भूमीला प्रेमानें भेटणाऱ्या सागराच्या आणि त्या भूमींत हिंदुसमाजाच्या जोडीनें नांदणाऱ्या ख्रिस्ती समाजाच्या अणुअणूशीं समरस झालेले आहेत असें आढळून येईल. ‘तिखट कढीनें जेवुनि घ्यावें, मासळिचा सेवित स्वाद दुणा’ असेंच ते आवडत्या जेवणाचें वर्णन करतात. वांकड्यातिकड्या पाउलवाटेचें वर्णन नुसत्या नागमोडी या शब्दानें करून त्यांचें समाधान होत नाहीं. त्यांची कविता गुणगुणते

“ फुरशासम मधुनी एकच पाऊलवाट ।
वळकांडीं घेउनि होती दूरच जात ! ”

( हा उतारा देऊन अनेक साप्ताहिकांना चार ओळी व तितकींच उद्गारचिन्हें छापण्याची संधि मी देत आहें हें मी जाणून आहें. ) ‘मुशाफिरा’ या कवितेंतील खालील सुंदर शब्दचित्र पाहून चित्रकाराचा कुंचलाहि मोहून जाईल.

सांज दाटली शिरीं
परतलीं घरा भिरीं
सांवळ्या रुखावळींत धूर मात्र कांपरा.
स्तब्ध मार्ग तांबडा
वळत जाय वांकडा
मोडक्या पुलाकडून तार जाय बंदरा.
काळवंडलीं जळें
चिंचही न सळ्सळे
वाटतें भयाण सर्व ! सलत आंत कातरा.

या कडव्यांत शब्दांनीं आपलें रुक्ष रूप टाकून रेषा, रंग आणि संगीत यांच्या साहाय्यानें नवीन मोहक रूप धारण केलें आहे असें नाहीं का वाटत ? ‘वारुणी रात’ या कवितेंत,

'माडामध्यें खोंप, तींतही जळे कुणाची भाटी,
पिउनी घे कुळवाडी तेथें दारू करटी वाटी !'

असें वास्तव वर्णन करणाऱ्या बोरकरांची अभागिनी वियोगिनी सागराशीं बोलूं लागते तेव्हां

'भिजत वाळुसम कां जावें मीं असें झुरोनी'
'काजळून अधिकचि जाई क्रूस व्योमभार्गीं'
'ओढतात रांपण कोळी गात काळरातीं
उजळ मासळी तडफडते, माड गाजताती
जाळ लाल भडके मधुनी, सावल्या सभोंती
निष्ठुरा ! प्रतिक्षणिं टाकिसि हृदय कां चिरोनी ?'

असे सुंदर करुणोद्गार तिच्या तोंडांतून बाहेर पडतात.

बोरकरांच्या या गोमंतकीय वैशिष्ट्यांतच त्यांनीं विपुलतेनें वापरलेल्या कोंकणी शब्दांचा उगम आहे. त्यांची कल्पना प्रगट होते ती रंगसंगति साधणारी तलम शब्द-वस्त्रें धारण करूनच !

'इतुक्या लवकरि येइ न मरणा'

या कवितेंत वझरा, पोवली, रेन्देर, चुडत, कुळागर वगैरे शब्दांनीं वातावरणाचा उत्कृष्ट परिपोष केला आहे यांत शंका नाहीं. मराठी वाचक मात्र या शब्दांशीं कदाचित् अडखळतील ! आणि काव्याच्या रसरंगांत वाचकानें शब्दापाशीं अडखळणें म्हणजे मधुर स्वरजाल निर्माण करणाऱ्या सतारीची तार मधेंच तुटण्यासारखें आहे. कळंजलें, दवरणें, गिम, चिरा, रुखावळ, व्हाळ, करवा, पोफळ, जिवजिवार, भिरीं— वगैरे या संग्रहांतील कितीतरी शब्द जितके अर्थवाहक तितकेच मराठी वाचकाला थोडेफार अपरिचित असे आहेत. मराठी भाषेची शब्दसंपत्ति वाढण्याच्या दृष्टीनें अनेक अन्वर्थक कोंकणी शब्द शक्य तितक्या लवकर मराठी लेखनांत सर्रास रूढ व्हावेत असेंच मला वाटतें. पण काव्याच्या द्वारें तसा प्रयत्न करणें कितपत इष्ट आहे याबद्दल मात्र मी थोडा साशंक आहें. गद्यापेक्षां काव्याला आधींच अधिक बंधनें

असतात. त्यांत अपरिचित शब्दांची मालिका म्हणजे जाडजूड बुरखाच ठरावयाचा कदाचित्! आंतल्या कल्पनेच्या सुंदर रूपाची वाचकांना कल्पनाहि येऊं द्यावयाचा नाहीं तो!

गोमंतकीय कवीपासून महाराष्ट्रानें सुंदर सृष्टि-वर्णनाची अपेक्षा करणें चुकीचें नाहीं. या संग्रहांतहि 'सांजवेळ' कवितेंतील

"तरुगिरींचिया ओळी कुणी फासल्याशा वाटे
तप्त सांवळ्या भूमीचा कोंडलेला श्वास सुटे.
श्रान्त कोलाहल टाकी वायुचिया स्कंधीं मान
सिंधुतीरीं घ्यावयाला सांजवेळ समाधान.
संध्याजळ व्याकुळलें तम पाहुनी गहन
चुळबुळे, खळबळे भाव होईना सहन
भव्य नौकांतले दीप स्तब्ध सावधान झाले
त्यांस देखुनी जळाचें खिन्न काळीज हाललें."

यासारखीं सुंदर निसर्गचित्रें सांपडतील. पण सुरम्य अगर सुंदर म्हणून केवळ फुलांचें, निर्झरिणींचें, सागराचें, विविध ऋतूंचें अथवा दिनरजनींचें वर्णन करण्याकडे बोरकरांचा कल नाहीं. परसांतला आंबा फळभारानें रंगून गेलेला त्यांनाहि दिसतो.

'पाचूवाणी जळावरी मोत्यावाणी फेंस'

हें समुद्रावरील रम्य दृश्य त्यांनाहि रमवितें.

'जलराणीचिया वक्षीं चंद्रबिंबा चढे तेज'

असें तेहि गुणगुणतात. पण ते फुलांचे अथवा निर्झरिणींचे कवि नाहींत; मानवतेचे कवि आहेत. त्यामुळें त्यांच्या सृष्टिविषयक सुंदर कल्पनाहि मानवी अनुभूतीशीं संबद्ध होऊनच येतात. गोमंतकांतलें विविध सृष्टि-सौंदर्य त्यांच्या कवितेंतहि चमकतें; पण तें पार्श्वभूमि म्हणून. रंगभूमीवर उभ्या असणाऱ्या नटांवर कुशलतेनें प्रकाश टाकून त्यांचा अभिनय जसा खुलवितां येतो, त्याप्रमाणें आपल्या भावनांची मोहकता वृद्धिंगत करण्याकरितांच बोरकरांनीं बहुधा सृष्टि-सौंदर्याचा उपयोग केला आहे.

बालकवि ‘अरुण’ अथवा ‘संध्यातारक’ यांच्या सौंदर्यांत बालभावानें रंगून जातात. ‘The Rainbow’ अगर ‘To the Cuckoo’ या कवितांतील वर्डस्वर्थ बालकवीपेक्षां फारसा भिन्न नाहीं. पण सृष्टि ही बालकवींशीं सदैव खेळणारी सखी आहे, तर वर्डस्वर्थला अनेकदां ती माता—गंभीर उपदेश करणारी माता भासते. बोरकरांची निसर्गाविषयींची भावना या दोघांहूनहि भिन्न आहे. शाकुंतलांतल्याप्रमाणें त्यांच्या कवितेंतहि निसर्ग मानवाशीं एकरूप–एकजीव झाला आहे. आणि गोमंतकी-यांच्या बाबतींत तसें झालें नाहीं तरच नवल! पणजी–मडगांवसारखीं थोडीं शहरें सोडून दिलीं तर गोमंतकाच्या इतर भागांतला निवास तपोभूमीला शोभणाराच असतो. वृक्षवेलींनीं आच्छादिलेलें निर्मळ घर, हांकेच्या अंतरावर झुळझुळ वाहणारा झरा, दारांत उभें राहून ज्यांचें दर्शन घेतां येईल असे निळसर डोंगर, जगाच्या कोलाहलापासून पूर्णपणें अलिप्त असें चिमणें सुंदर जग असतें तें! या जगांत सृष्टि आपल्यापेक्षां निराळी आहे, असा भास तरी कसा व्हावा?

संकेतनिष्ठ अगर अनुकरणात्मक कविता कधींहि पृथगात्म होत नाहीं. अक्षरशः पावलावर पाऊल टाकून चालणें एवढेंच आंधळ्याचें काम! यामुळें आपल्याकडील कितीतरी काव्यगीतें पाश्चात्य कवितेचे पुसट प्रतिध्वनि वाटतात. या अंध अनुकरणा-मुळें दुर्लक्ष झालेले आपल्या संस्कृतीचे उल्लेख बोरकरांच्या कवितेंत विपुलतेनें आढळतात ही आनंदाची गोष्ट आहे. तेजोदेवतेला उद्देशून ते म्हणतात—

“श्री हरिचें नाभि–कमल
ब्रम्ह्याचें प्रज्ञास्थल
तृतिय रुद्रनयन तूंच फुलविले प्रभावें.”
‘गृहस्थ जे हरि उरांत रिझवित
सदनीं फुलबागा रचिती’
‘पाजुनि केशव वाढविती’
‘ॐकाराचें अभंग लेणें’
‘चराचराची जीवनयात्रा
चाले गुंगत ज्या हरिमंत्रा’

‘ स्पर्शे करि मज हरुनि अहंपण
सामवेद साकार ’
‘ रात्रीं समईशीं वाचावी
ज्ञानेशाची अमृत—ओवी ’

इत्यादि चरण त्यांच्या या संस्कृतिलुब्ध वृत्तीचेच द्योतक आहेत. आपल्या पूर्वजांनीं काळाशीं झगडून सुरक्षित ठेवलेले कल्पनेचे अलंकार केवळ जुने म्हणून ते त्याज्य मानीत नाहींत. त्यांतल्या बावनकशी सोन्याचा त्यांना अभिमानच वाटतो.

मात्र हा अभिमान आंधळा नाहीं. संस्कृति म्हणजे जुन्यापान्या रूढींनीं भरलेली पोतडी नव्हे हें त्यांना पक्कें ठाऊक आहे. मानवधर्माच्या कसोटीला परंपरेंतला जो भाग टिकूं शकेल, ज्यांत कांहींना कांहीं तरी भव्य वा रम्य, बुद्धीला भुलविणारें अथवा हृदयाला हालविणारें असेल, आजच्या जीवनाशीं समरस होऊन त्याची गोडी वाढविण्याचें सामर्थ्य ज्याच्यांत असेल, त्याच आणि तेवढ्याच पूर्वपरंपरेंतल्या भागाची थोरकर पूजा करतात.

माणुसकीच्या धर्माविरुद्ध असलेल्या गोष्टी केवळ परंपरेनें पुनीत होत नाहींत हें ते तीव्रतेनें जाणतात. जीवन अडवून कोंडून घाण करायचें आणि मग त्याच्यावर दाटलेल्या शेवाळाच्या हिरव्या रंगांत रमून जावयाचें हें त्यांना बिलकूल मान्य नाहीं. ‘हुषार भाई’, ‘यापुढें’, ‘नवी भूपाळी’, ‘लोकसागरा’ व ‘प्रमादाचा पिंगा’ या कवितांत आजच्या समाजांतल्या जुलुमाचा आणि विषमतेचा त्यांनीं आवेशानें धिःकार केला आहे. ते लोकसागराला आवाहन करतांना म्हणतात

“ आज घडीला, तुझ्या तडीला
राज्य पसरलें बघ शंखांचें

\+ + +

तुझी हेलना करुनी चाले
तुझ्या जिवावर जी ही चंगळ

मुकाट बघशिल किती कोठवर
क्षुब्ध, क्रुद्ध हो महासागरा !
पोटीं जीं तव अगणित रत्नें
वर येऊं दे चमकत त्यांना !

दाही दिशांना त्रस्त करणारा विषमतेचा ज्वालामुखी समाजानें—विशेषतः समाजांतल्या वरिष्ठ वर्गानें आपल्या रक्तानेंच विझविला पाहिजे हें कटुसत्यहि त्यांना स्पष्ट दिसतें.

रोकडे, होउनी खडे, 'सुधेचे घडे,
देउं दुबळ्यांसी
विष खावुनि ग्रासोग्रासीं—यापुढें

असा त्यांचा निर्धार आहे. बोरकरांच्या या सर्व कविता वाचनीय असल्या तरी 'तुतारी', 'रुद्रास आवाहन' इत्यादि कवितांचा थाटच त्यांत उतरला आहे. कल्पनांची पुनरुक्ति नसली तरी विलक्षण असें नाविन्यहि त्यांत नाहीं. कवितेच्या या विभागांत त्यांची प्रतिभा नववधूप्रमाणें बावरून वावरत आहे असा भास होतो.

असें म्हणण्याचें कारण उज्ज्वल कल्पकता हा बोरकरांचा स्पृहणीय विशेष आहे. त्यांची कल्पनाशक्ति जितकी कोमल तितकीच भव्य आहे. मध्यरात्रीचें वर्णन ते

'मध्यरात्रिं नभ—घुमटाखालीं
शांतिशिरीं तम चवऱ्या ढाळी'

असें करतील आणि उद्यांच्या विजयी विशालभारताला 'विराट तरुवर' असें संबोधून त्याला उद्देशून उद्गार काढतील,

'स्कंधीं ग्रहगण तुझ्या काजवे
दिसति न ते जरि आज जगा !'

पहांटेच्या वेळीं पारिजातक हलविला कीं त्याच्या फुलांचा जसा सडा पडतो, त्याप्रमाणें हा काव्य-संग्रह सहज चाळणारालाहि कितीतरी मधुर कल्पना आढळतील.

‘ मम जीवन घुंगुर-सर
बांधिन तव पदिं सत्वर
क्षणभरि तरि तव भ्रमणीं त्या निनादवावें ॥’
(तेजो-देवतेस)

‘ यज्ञीं ज्यांनीं देउनि निज-शिर
घडिलें मानवतेचें मंदिर
परी जयांच्या दहन-भूमीवर
नाहिं चिरा नाहीं पणती ’
(तेथें कर माझे जुळती)

‘ तुझी माझि ग प्रीत साजणी
चांदण्यांतली लावणी ग ’

‘ दिसे तुझें लीलाजळ
फेन तयावरचा अमुचा विश्वगोल सारा ’

या पंक्ति वानगी म्हणून पुऱ्या होतील. आकाशाचें मनोगत, मुशाफिर, दवरणे, माझी आगबोट आणि प्रमादाचा पिंगा या पांच कवितासुद्धां त्यांची कल्पकता सर्व-संचारी आहे हें सहज सिद्ध करूं शकतील.

पण केवळ कल्पकता उत्कृष्ट काव्य प्रसवूं शकत नाहीं. कवितेंतल्या भावनेची सजीव अनुभूति वाचकाला आणून देण्याचें कठिण कार्य कल्पकतेनें केलें तरच ती काव्यदृष्ट्या यशस्वी होते. संगीत आणि चित्रमाला यांच्या मोहिनीमंत्रांशिवाय कल्पनेला हें यश मिळणें दुरापास्त असतें. सुदैवानें बोरकरांना या दोन्ही शक्तींची जोड लाभली आहे. ‘अमृतघट’, ‘सागरा’, ‘मुशाफिर’ इत्यादि कवितांतील एकएक कडवें किती सूक्ष्म आणि स्पष्ट चित्र डोळ्यांपुढें उभें करतें! कवितेच्या वेषभूषेंत तिळभर सुद्धां वैगुण्य राहूं नये म्हणून बोरकर शब्दांच्या माधुर्याबद्दल दक्ष असतातच, पण शब्दांच्या माधुर्यापेक्षांहि त्यांच्या कवितेंतील नादाचें नर्तन अत्यंत मोहक आहे. जणुं कांहीं ‘नादांत गुंगसी जें शब्दांत सांग बाले’ असेच ते आपल्या कल्पनेला आळवतात.

'करि सुंदरि स्वरशृंगार' असा सुंदर आरंभच करून ते थांवत नाहींत. त्यांची प्रतिभा लगेच स्वरशृंगार करूनच येते. ते तत्काळ उद्गारतात

'भुवनीं भवनीं हृदय-उपवनीं
तरल विरलतर पवनावरणीं
मृदुल मधुतर स्वरलहरींनीं
अखंड करि संचार !'

दत्त, बालकवि, तांबे, चंद्रशेखर इत्यादि हातांच्या बोटांवर मोजतां येण्याजोग्या कवींतच नादब्रह्माचा हा विलास अनुभवायला मिळतो.

बोरकर गुंगत कविता करतात, का कविता करतां करतां गुंगून जातात हें मला तरी कोडेंच आहे. 'करि सुंदरि स्वरशृंगार' या कवितेची पक्की आठवण आहे मला! ते माझ्याकडे आले होते त्या दिवशीं! स्वारी कवितेचें पहिलें कडवें गुणगुणतच घरांत प्रवेश करती झाली. बहुधा मोटारीच्या प्रवासांतच तें त्यांना स्फुरलें असावें. त्यांच्या या काव्यरचनेच्या पद्धतीमुळें त्यांची बहुतेक कविता गेय झाली आहे. 'मिश्र-पहाडी,' 'मिश्र पिलु-केरवा' वगैरे त्यांच्या कवितांच्या आरंभीं आलेले संगीत-प्रतिनिधि तोतये नाहींत हें मी त्यांच्या कविता वारंवार ऐकल्या असल्यामुळें सांगूं शकेन. तथापि कांहीं नवीन जातीपलिकडे सामान्य वाचकाची गेय चालींत गति नसल्यामुळें या संग्रहांतील कित्येक गीतांची गोडी त्याला पुरी कळणार नाहीं अशी थोडीशी भीति वाटते. मात्र केवळ गाण्यामुळेंच गोड वाटणाऱ्या कवितांपेक्षां ही गीतें अत्यंत भिन्न आहेत. बालगंधर्वांची गद्यभूमिकाहि मी यशस्वी करून दाखवीन असें गडकरी म्हणत असत. बोरकरांच्या कविता साध्या वाचल्या तरी त्यांतील कल्पनावैभव व भावना-विलास मनाला भुरळ पाडल्यावांचून राहणार नाहींत.

या संग्रहांत विपुल प्रेम-गीतें आहेत हें स्वाभाविकच नाहीं का? यौवन, प्रीति आणि कविता हीं जुळीं भावंडेंच आहेत. आणि सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें तर प्रौढांना काय प्रेमगीतें वाचावयाला अगर ऐकायला नको असतात? 'डोळे हे जुल्मी गडे'ची तबकडी घरोघर सारखी लावून जर कुणी खराब केली असेल तर ती प्रौढ स्त्री-पुरु-

षांनींच ! प्रेमगीतें व प्रणय-कथा यांच्या या आसक्तीची मानसशास्त्र कशीहि मीमांसा करो, त्यांची आवड अगदीं सार्वत्रिक असते. मानवी रक्तालाच प्रणयाची अनिवार्य ओढ आहे. स्वप्न, अनुभव आणि स्मृति यांपैकीं कोणत्या ना कोणत्या रूपानें प्रीति मनुष्याच्या मनांत वास करीतच असते. हीं मनांतलीं मुकीं गाणीं प्रेमगीतांचे सूर ऐकतांच नाचूं लागलीं तर त्यांत नवल कसलें ?

बोरकरांच्या प्रेमगीतांपैकीं 'संधिकाल,' 'तीन-सांजा,' 'येइ सखी,' 'कारागीर,' 'परिचयें प्रेम तव जाइल का ?' 'माझी आगबोट' एवढीं वाचून पाहिलीं तरी त्यांच्या सौंदर्याची व सोज्वळतेची कल्पना येईल. 'तीन-सांजा' मधील मधुर वातावरण 'कारागीर' मध्यें उदात्त होतें, 'माझी आगबोट' मध्यें तें कारुण्यानें चमकतें—आणि 'परिचयें प्रेम तव जाइल का ?' या गीतांत तें गंभीरपणानें मनोविश्लेषणाच्या धुक्यानें नटतें. प्रीतीच्या हिऱ्याचे सर्व पैलु कवीनें जवळून पाहिले आहेत हें हीं गीतें वाचल्यावर आपोआपच कळतें.

मात्र कित्येकांच्या प्रेमगीतांत जो उन्माद अगर जी निराशा असते, त्यांचा या गीतांत सहसा आढळ होत नाहीं. याचें एक कारण बोरकरांच्या काव्यप्रतिभेला तत्त्वज्ञानाची हौस आहे हें असावें. 'ऐक्यगानां'त ते म्हणतात

> "ऐक ! ऐक ! ऐक्य तुझें तुजसि साद घाली
> विश्व हें अनंत गान
> जीवन तव एक तान
>
> \+ + +
>
> एकच स्वर पालटून या अनंत चाली"

'वास्तव्य कुणाचें तेथ असे' ही सुंदर कविताहि काव्य व तत्त्वज्ञान यांच्या संगमांतूनच निर्माण झाली आहे. 'सायुज्यमुक्ति' सारख्या कांहीं कवितांत काव्याला तत्त्वज्ञान भारी झाल्यामुळें रसाची नदी बाह्यतः गोठल्यासारखी भासते. गूढगुंजनाचा प्रारंभ काव्य व तत्त्वज्ञान यांच्या संकरांतच होत असतो. बोरकरांच्या प्रतिभेला अनेक नवे

प्रदेश पादाक्रान्त करतां येण्यासारखे आहेत. तेव्हां त्यांनीं सहारांत सुंदर मंदिरें बांधणाऱ्या गूढगुंजनवादी मंडळींना मदत करायला न जाणेंच श्रेयस्कर होईल.

बोरकरांच्या आयुष्यांत दैवाच्या करनकरी वशाचे, निराशेचे, अतृप्तीचे किंवा आकांक्षा विफल झाल्याचे प्रसंग कमी आले आहेत असें नाहीं. त्यांची जीवननौका खडकांवर आपटत आपटतच पुढें चालली आहे. पण ते वृत्तीनें झुंजार आहेत. आणि आपलें अंतःकरण त्यांनीं काव्यांत ओतलें असल्यामुळें त्यांच्या गीतांतही निराशेची कृष्णच्छाया किंबहुना छटाहि कुठें दिसत नाहीं. स्वतःच्या लहानसहान अनुभूतींचाहि त्यांनीं काव्याला उपयोग करून घेतलेला आहे. पण त्यांची आत्मनिष्ठा दुबळी अगर आंधळी नाहीं. त्यांची प्रतिभा रडवी नाहीं; कडवी आहे. गाण्याकरितां आपला जन्म आहे, रडगाण्याकरतां नाहीं, हें तिला स्वभावतःच कळलेलें आहे. त्यांना प्रेम हवें, पण नुसत्या प्रेमानें आयुष्य पूर्ण होत नाहीं, त्याला पराक्रमाचीहि जोड पाहिजे अशी त्यांची श्रद्धा आहे. ते म्हणतात—

'तुझ्या मनगटावरी खेळणें मला नको कां गडे
विक्रमविरहित विलास तरि तुज काल किती आवडे.'

पृ. ११

इतकेंच नव्हे तर स्वतःचें प्रेम आणि पराक्रम यांच्या चिमुकल्या उबदार घरट्यांत गुरफटून बसायलाहि त्यांचें मन राजी नाहीं.

अन्य देशिंचीं विभव–विलसितें
पाहुनि परिसुनि मानस रमतें
तोंच उणें सलुनी तें पुसतें
'अदृष्ट कधीं येईल उदया ?'
आणि कधि कधि ध्येयासाठीं
लढतां लढतां जिवलग तुटती
सुखा येइ वैराग्यें दीप्ति
तरि नित्य ज्योत जाळी हृदया

'कणव' या कल्पनेनें नटलेल्या गीतांत त्यांनीं देवाच्या दयेला जो साभार नकार दिला आहे, त्याचें मूळहि त्यांच्या या मनोवृत्तींतच आहे. या उदात्त भूमिकेमुळेंच त्यांना दगडांचा त्यागही दिसूं शकतो, (दवरणें ही कविता पहावी) आणि 'तेथें कर माझे जुळती' व 'अमृतघट' यांच्या सारखीं मधुरोदात्त गीतें ते लिहितात. बोरकरांनीं नुसत्या या दोन कविता लिहिल्या असत्या तरी मराठी रसिकांनीं त्याचें नांव अभिमानानें उच्चारलें असतें.

गुलावाला कांटे असतात आणि बाभळीलाहि कांटे असतात. पण दोन्हींच्या कांट्यांत फार फरक असतो. या काव्यसंग्रहांतहि दोष नाहींत असें नाहीं. जमीन-जुमल्याच्या बाबतींत लावला जाणारा स्थावरजंगम शब्द जीवनाला लावल्यामुळें थोडा विरस होतो, नभघुमट हा घेडगुजरी शब्द आहे, मनवृंदावन, हृदयउपवनीं हे समास बरोबर नाहींत, तृतिय, हिमरुपी वगैरे अनेक शब्दांत ऱ्हस्वदीर्घांची ओढाताण आहे, 'हुषार भाई' सारख्या कवितांतील कित्येक भाग गद्यवजा भासतात, वगैरे तक्रारी टीकाकारांकडून होतीलच. मास्तर असल्यामुळें त्या मलाहि मान्य आहेत. पण घर बांधून झाल्यावर जशी पायांत दुरुस्ती करतां येत नाहीं, त्याप्रमाणें कविता लिहून झाल्यावर रसभंग न करतां तिची दुरुस्ती करणें कवींना एकंदरींत जडच जातें! बोरकर पुढील काव्यलेखनांत असलीं वैगुण्यें येऊं देणार नाहींत अशी खात्री वाटते. कारण गालबोट लहान मुलालाच शोभतें हें काय त्यांना ठाऊक नाहीं ?

असल्या किरकोळ दोषांपेक्षां एक निराळीच गोष्ट बोरकरांना मला सुचवावीशी वाटते. कल्पकता हा कवीचा अत्यंत मोठा गुण आहे यांत शंका नाहीं. त्यामुळें तर 'सुहृदास' सारख्या या संग्रहांतील वैय्यक्तिक स्वरूपाच्या कविताहि वाचनीय वाटतात. पण भावना पदोपदीं कल्पनेचा आश्रय करून व्यक्त होऊं लागली कीं तिचें स्वरूप नकळत अंधुक होतें. या संग्रहांतल्या अनेक कवितांत—'अमृतघट' या उत्कृष्ट हृदयस्पर्शी कवितेंतहि थोडासा असाच प्रकार झाला आहे. या कवितेंतील सगळें वातावरण, सगळीं चित्रें, अगदीं साधीं, घरगुती आहेत. परंतु शेवटच्या गोड कडव्यांत एकदम

"तूं हंससी उपहासें, तरुणा ।
यात्रेकरूनां, कस्तुरिहरिणां"

या ओळी येतात. यांतील यात्रेकरू व कस्तुरी हरिण यांचा मध्यवर्ती भावनेशीं असलेला निकट संबंध सहज स्पष्ट होत नाहीं. त्याचा विचार वाचक करूं लागला कीं रसाचा ओघ खंडित झाल्याशिवाय रहात नाहीं. सुंदर कल्पना एका मर्यादेपर्यंतच भावनेचा परिपोष करूं शकतात. ही मर्यादा कल्पनेच्या मोहाला बळी पडली कीं दिसेनाशी होते व भावना कल्पनांत गुरफटून जाते. म्हणून लेखकाला भरारीप्रमाणें संयमहि हवा ! या उपदेशांत स्वानुभव आहे, हेंहि जातां जातां कबूल करावयाला हरकत नाहीं.

प्रो० माटे यांच्या 'वाङ्मय लिहिणारानें या पुढें पद्याच्या भानगडींत न पडतां, त्याला जें काय लिहावयाचें तें सर्व गद्यांतच लिहावें' या विधानाला उत्तर देतांना तात्यासाहेब केळकरांनीं पद्यांत व्याकरणाचीं अनेक रूपें वापरतां येतात, वाटेल तितके अनुप्रास साधतां येऊन यमकांमुळें कल्पना सुचतात, पद्य गेय असल्यामुळें स्मरणांत राहूं शकतें, इत्यादि काव्याचे अनेक उपयोग सांगितले आहेत. ते सर्व खरे असले तरी मानवी जीवनांतलें काव्याचें स्थान कांहीं त्यामुळें निश्चित होत नाहीं असें मला वाटतें. प्रणयानें मुग्ध झालेला रमण आपल्या रमणीला स्वयंपाक करतां येतो कीं नाहीं, ती आपले फाटलेले सदरे घरींच शिवील कीं आपणांला पुढेंहि शिंप्याकडे पायपीट करण्याची पाळी येईल, ती उंच असल्यामुळें तिला अधिक लांबरुंद पातळें घ्यावीं लागून आपला खर्च वाढेल कीं काय, अशा गोष्टींचा विचार कधींतरी करीत बसतो का ? रमणी ही जशी जीवनांतली जादुगारीण, त्याप्रमाणें कविता ही वाङ्मयांतली मोहिनी होय. मानवतेचा पुनर्जन्म या दोघींमुळेंच होतो.

काव्यच नको म्हणणारे व सामान्य माणसाला काव्याची जरुरी नाहीं असें सांगणारे, एकाच माळेचे मणि. गरीबांना फुलांचा काय उपयोग आहे, फळें असतीं तर बिचाऱ्यांची एक वेळ तरी निभावली असती, असें प्रतिपादन करण्यासारखाच हा प्रकार नाहीं का ? सातव्या एडवर्ड बादशहांच्या प्रेमळ स्वभावाचें प्रत्यंतर म्हणून त्यांनीं आपल्या कोटाला लावलेलें फूल इस्पितळांतील एका आजारी मुलीला दिलें

अशी गोष्ट एका इंग्रजी क्रमिक पुस्तकांत आहे. शाळेंतल्या मुलांपेक्षांहि समाजांतल्या पंडितांनाच ती शिकविली पाहिजे असें काव्यासंबंधी जीं विधानें सध्यां करण्यांत येत आहेत त्यांवरून वाटूं लागतें. उद्यां सामान्य मनुष्यांना संगीताची, फार काय प्रेमाचीही, जरुरी नाहीं असें हे उपयुक्ततावादी पंडित सिद्ध करावयाचे !

खरें पाहिलें तर सामान्य मनुष्यालाच काव्याची उणीव तीव्रतेनें जाणवते. सगरपुत्रांच्या पाताळांत पडलेल्या रक्षेच्या उद्धाराकरितांच मंदाकिनी स्वर्गातून खालीं आली ही जी पौराणिक कथा आहे, ती कवितेवरलें सुरेख रूपक होऊं शकेल. महात्माजी आणि जवाहिरलाल यांच्या दैनंदिन जीवनांत, क्षणोक्षणींच्या चिंतनांत आणि पदोपदींच्या कृतींत उदात्त काव्य आहे. त्यांच्या विविध भावनांचा विलास, त्याग आणि सेवा यांच्या रूपानें प्रगट होत आहे. पण बिचारा सामान्य मनुष्य पोटाच्या पाठीमागें धांवतां धांवतां थकून जातो. आपल्या दुःखाची आग अश्रूंनीं विझवितां विझवितांच त्याचे डोळे कोरडे, अगदीं शून्य होतात. त्याला उच्च—उदात्त फारसें दिसूं शकत नाहीं आणि अंधुकपणें दिसलें तरी त्याच्यामागें धांवण्याचें त्राणहि त्याच्या पायांत असत नाहीं. पण अशा माणसांना काय भावना नसतात ? त्या भावना काय जागृत होऊं शकत नाहींत ? त्या जागृतीचा दिव्य क्षण काय त्यांना नकोसा झालेला असतो ? उच्च संस्कारांनीं होणारा त्यांच्या भावनांचा विकास व्यक्ति आणि समाज या दोघांनाहि उपकारक होत नाहीं असें थोडेंच आहे ! त्यांच्या आयुष्यांतहि अमर क्षण येऊन गेलेले असतात. मात्र त्यांची अमरता त्यांना पूर्णपणें पटलेली नसते. मानवतेच्या हृदयांत अवगाहन करून सर्वांच्या अनुभवाचे हे अमर क्षण कवि शोधून काढतात, त्यांना आपल्या कलाकुशल कल्पनेनें नटवितात आणि मग त्यांची असामान्यता सामान्यांनाहि कळूं लागते. काव्याची सृष्टि एका दृष्टीनें अलौकिक खरी ! पण तिचा उगम या लौकिक जगांत—लौकिक भावनांत—मानवतेच्या हृदयमंदिरांतच असतो. ‘गद्यांत सर्व कांहीं सांगतां येतें’ असें ज्यांना वाटत असेल त्यांनीं ‘अमृतघट’, ‘मुशाफिर’, ‘तेथें कर माझे जुळती’, ‘सागरा’, ‘तीनसांजा’ इत्यादि या संग्रहांतील कवितांचा आशय शक्य तितक्या मधुर गद्यांत श्रोत्यांना सांगून पहावा व नंतर या कविता गाऊन दाखवाव्यात (अर्थात् म्हणतां

येणाराकडूनच). गद्य कितीहि दिग्विजयी झालें तरी ते काव्याची यक्षभूमि जिंकूं शकत नाहीं, हें दोन घटकांत त्यांच्या प्रत्ययाला येईल.

काव्याला ओहटी लागली असो अगर नसो, मराठी रसिकतेला तरी ती खास लागलेली नाहीं. त्यामुळें बोरकरांच्या या मधुर संगीताची योग्य ती वाहवा होईलच. त्यांच्या काव्यसंगीताला प्रस्तावनेच्या रूपानें खरोखर सारंगीचीच साथ हवी होती. पण त्यांनींच आग्रहानें एक तबला बडविणारा तिथें आणून बसविला ! तो बिचारा चार थापा मारण्याखेरीज अधिक काय करूं शकणार ? अर्थात् प्रस्तावना न आवडणाऱ्या वाचकांना बोरकरांकडून अधिक चांगल्या कवितांच्या रूपानें नुकसानभरपाई मागण्याचा पूर्ण हक्क आहे.

गोमंतकाची भूमि जशी काव्यानुकूल आहे, तसे बोरकरहि स्वभावानें काव्यात्म आहेत. 'क्ष' किरणांनीं शरीराच्या आंतील भाग स्पष्ट दिसावा, त्याप्रमाणें त्यांच्या सौंदर्यशोधक दृष्टीनें साधा विषय पाहिला तरी त्याच्या आंतील काव्य प्रकट होऊं लागतें. त्यांच्या दैनिक वेळापत्रकांत काव्याचा तास ठरलेला नाहीं. अष्टौप्रहर ते कवीच असतात. मे महिन्याची सुट्टी पडल्यामुळें ज्यांची प्रतिभा जागृत होते अशा कवींपैकीं ते नाहींत. व्यावहारिक कामांच्या धांवपळींतहि त्यांची कविता त्यांना सोडून जात नाहीं. लहानपणीं सगळेच कवि असतात व म्हातारपणीं सगळेच तत्वज्ञ होतात, हें खरेंहि असेल ! पण कवीचें खरें कर्तृत्व केशवसुतांनीं म्हटल्याप्रमाणें 'प्रौढत्वीं निजशैशवास जपणें' या गोष्टींत आहे. गोष्ट सोपी नाहीं हें मीही जाणतों. प्रापंचिक व्याप व व्यावहारिक ताप यांच्यांत कल्पवृक्षाच्या कळयासुद्धां जळून खाक होतील. मग मानवी कल्पनेची काय कथा ? पण यौवनांतली काव्यदृष्टि प्रौढत्वांत कायम ठेवणें दुर्घट असलें तरी अशक्य नाहीं, हें तांच्यांच्या उदाहरणावरून दिसून येईल. तपश्चर्येचा भंग आपल्या दुबळेपणानें होतो, तसा बाहेरील राक्षसांमुळें व अप्सरांमुळेंहि होतो ! तो होणार नाहीं अशी दक्षता घेतली तर बोरकरांना पहिल्या प्रतीचें कवियश असाध्य नाहीं. कुणी कांहीं म्हणो, आयुष्यांतले विविध अनुभव घेतल्यानंतर मनुष्याच्या प्रत्येक भावनेंत सत्य आणि सौंदर्य यांचा जो संगम होतो, तो तरुणपणांतल्या अपरिपक्व भावनांत

आढळणें शक्य नाहीं. कालिदासापेक्षां भवभूतीची लोकप्रियता कमी आहे हें ठाऊक असूनहि शाकुंतलाचा पहिला व तिसरा अंक लिहिणाऱ्या प्रतिभेपेक्षां उत्तररामचरिताचा पहिला व तिसरा अंक लिहिणारी प्रतिभा मला अधिक श्रेष्ठ वाटते. बोरकरांच्या प्रतिभेचें असें परिणत स्वरूप मराठी रसिकांना पहायला मिळावें म्हणूनच हें लिहिलें. ऐन पंचविशींतच म्हातारे होण्याची सांथ अलीकडे साहित्यिकांत पसरूं लागली आहे. उदयोन्मुख लेखकाला हौसेनें पहावयाला जावें, तों त्याचा अस्तहि होऊन गेलेला असतो! बोरकर या सांथीला बळी पडणार नाहींत अशी मला खात्री आहे. आज लघुनिबंधकार म्हणून ते मराठी वाचकांपुढें आले आहेत. उद्यां कदाचित् कादंबरीकार म्हणूनहि ते चमकतील आणि मग—पण कांहीं झालें तरी त्यांना कवितेला सोडतां येणारच नाहीं. त्यांना आपले हात जुळवून वंदन करायला लावणारे नवयुगांतील अनेक पराक्रमी वीर क्षितिजावर दिसूं लागले आहेत, त्यांना आंतून बावरायला लावणाऱ्या नवयुगांतील सुंदर तिनीसांजाहि निर्माण होतील. किनाऱ्याजवळून संथपणें जाणाऱ्या नौकेचें जीवन त्यांच्या पिढीच्या वांट्याला येणार नाहीं हें खरें! पण किनाऱ्यावरील सौम्य-सुंदर दृश्यापेक्षांहि वादळाचें रुद्ररम्य रूपच कल्पनेला अधिक स्फूर्तिदायक वाटतें. नाहीं का?

शिरोडें,<br>
११–१०–३७

वि. स. खांडेकर

# अनुक्रमणिका

—:०:—


| विषय | पृष्ठ | विषय | पृष्ठ |
|---|---|---|---|
| कविवर भास्करास ... ... | १ | फसवणूक ... ... | ३१ |
| तेजोदेवतेस ... ... | २ | हिमालयास ... ... | ३२ |
| तेथें कर माझे जुळती ... | ३ | विशाल भारत ... ... | ३३ |
| करिं सुंदरि स्वरशृंगार ... | ५ | हुशार भाई ... ... | ३४ |
| कशि तुज समजावूं सांग ? ... | ७ | यापुढें ... ... ... | ३८ |
| येइं सखी ... ... | ८ | सुहृदास... ... ... | ४० |
| जादुगारा ! ... ... | ९ | आकाशाचें मनोगत ... ... | ४२ |
| उरलें घरटें दूर ! ... ... | ११ | कवण तूं ! ... ... | ४३ |
| इतुक्या लौकर येइं न मरणा ... | १२ | कारागीर ... ... | ४४ |
| अमृतघट ... ... | १४ | तीन सांजा ... ... | ४५ |
| ऐक्यगान ... ... | १६ | विरोधी भक्ति ... ... | ४६ |
| सांजवेळ ... ... | १७ | संधिकाल ... ... | ४८ |
| दवरणें ... ... ... | १८ | प्रणयमुग्धेस ... ... | ४९ |
| मुशाफिरा ... ... | २० | गोड कळ ... ... | ५० |
| तुझी माझी प्रीत ... ... | २१ | शेज ... ... ... | ५१ |
| आणि मज माउलीच जाहली ... | २२ | परिचयें प्रेम तव जाइल का ? ... | ५२ |
| गेलें भिउनि मनांत ! ... | २३ | माझी आगबोट ... ... | ५४ |
| वारुणी रात ... ... | २४ | मनमार ... ... ... | ५५ |
| पारिजात ... ... | २६ | माउलीचा खेळ ... ... | ५६ |
| सायुज्यमुक्ति ... ... | २७ | नवी भूपाळी ... ... | ५७ |
| क्षणभंगुर जरि जीवन ... | २९ | लोकसागरा ! ... ... | ५९ |
| सागरा ... ... ... | ३० | वास्तव्य ... ... | ६२ |

| विषय | पृष्ठ | विषय | पृष्ठ |
| --- | --- | --- | --- |
| कणव ... ... ... | ६३ | —स ... ... ... | ७५ |
| वेड ... ... ... | ६५ | प्रमादाचा पिंगा ... ... | ७६ |
| वैभव ... ... ... | ६६ | प्रसादाची वाट ... ... | ७८ |
| मालवणारी वात ... ... | ६८ | माझ्या हिऱ्यास ... ... | ७९ |
| रे फुलेंच जड गमती हृदया ... | ६९ | निरोप ... ... ... | ८० |
| हिरकणी ... ... ... | ७१ | किति दयाघना करितोस ऋणी ? | ८१ |
| तुझ्या तेजें ... ... | ७३ | माझे अश्रू ! ... ... | ८२ |
| आकांक्षा... ... ... | ७४ | माझ्या गीतांस ... ... | ८३ |

काव्य क्र. ११६३
१२५५१ ३८



## कविवर भास्करास

[ जाति—मुनिकन्या. राग भैरव. ]

कविवर भास्कर गावा
आळवोनि नव रागरागिणी रंग दिशांत भरावा
अमृतोपम मन कनकमनोरम
सकल कलांचें तीर्थचि संगम
जेथुनि जीवन स्थावर जंगम
पावे उदय विसावा—

स्पर्शे ज्याच्या तृणांत मोतीं
धुळींत ये सोन्याला भरती
पिकांस मनिंच्या न मुळीं गणती
मत्त वसंतहि भावा—

घट घरिंचे जन घ्या घ्या भरुनी
उदंड घ्या आकंठचि पिउनी
पोरां थोरां द्या हो वांटुनि
उजळा नांवा गांवा—

पिउनि खगांनो नादि वनावें
सलें जगाचीं विसरुनि जावें
जीवेंभावें गात उडावें
जयजयकार करावा.

१९-३-३६.

मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ५५८८

# तेजोदेवतेस

[ जाति—शुभवदना. आरंभी-एकताल ]

चपल तुझे चरण जरा या घरीं स्थिरावे
आणि दिव्य किरण तुझे अंतरीं शिरावे.
कुठुनि कुठें सांग जाशि
उज्ज्वल आनंदराशि
आळवीत गौरवीत दीपराग भावें ?
श्रीहरिचें नाभिकमल
ब्रह्मयाचें प्रज्ञास्थल
तृतिय रुद्रनयन तूंच फुलविलें प्रभावें.
शक्कर्त्यां शुभवचनीं
प्रमदांच्या रतिनयनीं
सज्जनमनवृंदावनिं किति तुला भजावें ?
समरधुरंधर—खड्गीं
न्यायकंटक—शृंगीं
गौरी ! ज्वालाविलास दाविसी स्वभावें.
तव चंचल मृदु चरणीं
सांकुर कुसुमित धरणी
बघुनि मुदित स्थिरचर का मीं उगी रहावें ?
मम जीवन घुंगुर—सर
बांधिन तव पदिं सत्वर
क्षणभरि तरि तव भ्रमणीं त्या निनादवावें.

पणजी, १–१–३५.

# तेथें कर माझे जुळती

[ जाति—प्रणयप्रभा. मिश्र पहाडी—त्रिताल. ]

तेथें कर माझे जुळती
दिव्यत्वाची जेथ प्रतीती.

हृन्मंदिरिं संसृतिशरस्वागत
हंसतचि करिती कुटुंब-हितरत
गृहस्थ जे हरि उरांत रिझवित
सदनीं फुलबागा रचिती—
तेथें कर माझे जुळती.

ज्या प्रबला निज भावबलानें
करिती सदनें हरिहरभुवनें
देव पतींना वाहुनि सु-मनें
पाजुनि केशव वाढविती—
तेथें कर माझे जुळती.

गाळुनियां भाळींचे मोतीं
हरीकृपेचे मळे उगविती
जलदांपरि येउनियां जाती
जग ज्यांची न करी गणती—
तेथें कर माझे जुळती.

शिरीं कुणाच्या कुवचनवृष्टी
वरिती कुणि अव्याहत लाठी
धरिती कुणि घाणीची पाटी

## जीवन-संगीत

जे नरवर इतरांसाठीं–
तेथें कर माझे जुळती.

यज्ञीं ज्यानीं देउनि निजशिर
घडिलें मानवतेचें मंदिर
परी जयांच्या दहनभूमिवर

नाहिं चिरा नाहीं पणती–
तेथें कर माझे जुळती.

स्मितें जयांचीं चैतन्यफुलें
शब्द जयांचे नव दीप-कळे
कृतींत ज्यांच्या भविष्य उजळे

प्रेम-विवेकीं जे खुलती–
तेथें कर माझे जुळती.

जिथें विपत्ती जाळी, उजळी
निसर्ग-लीला निळी काजळी
कथुनि कायसें काळिज निखळी

एकाची सगळी वसती–
तेथें कर माझे जुळती.

मध्यरात्रिं नभघुमटाखालीं
शांतिशिरीं तम चंवऱ्या ढाळी
त्यक्त, बहिष्कृत मी ज्या काळीं

एकांतीं डोळे भरती–
तेथें कर माझे जुळती.

पणजी, १६–२–३३

ग्रंथ ११८५
२४१५४३६

# करिं सुंदरि स्वरशृंगार !

[ मिश्र पिलू—केरवा. ]

करिं सुंदरि स्वरशृंगार.
भुवनीं भवनीं हृदय–उपवनीं
तरल विरलतर पवनावरणीं
मृदुल मधुरतर स्वरलहरींनीं
अखंड करिं संचार.

गान न तें, फुलणें, लखलखणें
ॐ काराचें अभंग लेणें
दिव्य जिवाचें संपूर्ण जिणें
ऐंद्रिय साम्य-विहार.

जलीं, स्थलीं, मलिं, अनलीं, अनिलीं,
तृणपर्णीं, चरजनीं, ग्रहगणीं
लपलें स्वरसौंदर्य उकलुनी
गुंफ तयाचा हार.

चराचराची जीवनयात्रा
चाले गुंगत ज्या हरिमंत्रा
तत्संगीतें भरिं हृत्पात्रा
करिं तनु हिमसम गार.

मम देहीं जीं बीजें निजलीं
युगकल्पांच्या अवजड चिखलीं
स्वप्नें सरुनि न अजुनि उगवलीं



५५८८

शिंपड चार तुषार.

हो जीवन तेणें वलयांकित
हृदयांचीं क्षितिजें ओलांडित
अवकाशाचे लोकहि व्यापित
ढवळो पारावार.

कर उन्नत मम, ॐ कारचि तन
हृदयंगम संगीतहि जीवन
स्पर्शें करिं मज हरुनि अहंपण
सामवेद साकार.

# कशि तुज समजावुं सांग ?

[ तिलंग—एकताल. ]

कशि तुज समजावुं सांग ?
कां भामिनि उगिच राग ?
हास्याहुनि मधु रुसवा
हेमंतीं उष्ण हवा
संध्येचा साज नवा
हा का प्रणयानुराग ?
चांफेकळि केविं फुले ?
ओष्ठकमल केविं उले ?
भोंवतीं मधु गंध पळे
कां प्रसन्न वदन-राग ?
वृत्तींचा होम अमुप
त्यांत जाळुं गे विकल्प
होउनिया निर्विकल्प
अक्षय करुं यज्ञयाग.
ओठांचे फेड बंध
गाइं गडे मुक्त छंद
श्वासांचे करुं प्रबंध
हृदयांचें मधु प्रयाग.

पणजी, २६–१०–३२.

# येइ सखी

[जाति–शुभवदना. खंबावती—एकताल.]

येइ सखी हंसतमुखी हळु हळु वर जाऊं
अणुअणुनीं पार्थिवता गाळित जग पाहूं.
नील गहन शांत गगन
विरल त्यांत चंद्रकिरण
जणुं अथांग आर्द्र नयन
ही शराब प्राशुनि बेफाम धुंद होऊं.
पर्णांचें मृदु कंपन
लहरींचें आंदोलन
कलिकांचें तरल श्वसन
नसनसांत खेळवीत विकलगात्र होऊं.
शीतलतेचें अंजन
वायूचें रूप धरुन
स्फूर्तीचे पंख करुन
या अनंत विस्तारीं रंगुनी तरंगूं.
शीतल करुं चंद्रासन
या अथांग यमुनेंतुन
संगम-उत्सव करून
कणकणांत हिम भरीत शांतकाय होऊं.

बोरी, १४-१[redacted]-३२.

# जादुगारा !

[छंद—जादूगार. झिंझोटी—धुमाळी.]

कोण वेळ साधियली श्रीरंग जादुगारा ?
बांसरी-स्वराचा गळ रे लागला जिव्हारा.

पोटीं उठे कळवळा
भूक कानीं होय गोळा
जीव होय चोळामोळा
दुकाळलीं वर्षें कथिती व्यर्थ हा पसारा !

ओढुनी मनींची दोरी
केली रहस्याची चोरी
कुठें जीवनाची थोरी !
वैजयंति संसाराची उधळली भरारा.

फांद्यांवरी माझें घर
वातें हाले थरथर
केलें मला तेंही दूर
आणि व्योमगर्भी मज कां फेंकिलें दिलारा ?

आकाशींची डोळां नीळ
करी हृदया निवळ
दिसे तुझें लीलाजळ
फेन त्यावरी हा अमुचा विश्वगोल सारा.

स्वरासवें रानींवनीं
हिंडविसी या जीवनीं
तगमग होई मनीं
तोड बन्ध हे अस्थींचे नोढवे शरीरा.

पणजी, १९३२.

१९८३ २५-५-३६

# उरलें घरटें दूर !

[ जाति—चंद्रकांत ]

पंखांवरती रंग झेलुनी गळ्यांत स्वर कोवळे
हिरवें जग भंवतींचें केलें उडतां उडतां निळें.
इवल्या पंखां अंतराळ तें आलें ना आवळूं
जीव भुकेला देहासंगें हळू लागला गळूं
तों सोन्याच्या उन्हीं देखिले सजीव कण सानुले
झुकली चुकली झेप, गुंतलीं जाळीं या पाउलें.
जाल न तें तव हास्य चंचले, कण ते दशनांकुर
हाल मांडिले माझे जरि तूं गमती मज सुंदर.
अंतराल हरपलें आणखी इथें गवसलों असा
उरलें घरटें दूर, जाहलों इकडे वेडापिसा.
संध अशी साधुनी साजणी पंख नको कातरूं.
निळें पांचवें रहस्यमय जग नको स्वामिनी हरूं.
तुझ्या मनगटावरी खेळणें मला नको का गडे ?
विक्रमविरहित विलास तरि तुज काल किती आवडे ?

पणजी, १६—११—३५.

---

## इतुक्या लौकर येइं न मरणा

[ जाति—नववधू. गांधारसारंग—केरवा ]

इतुक्या लौकर येइं न मरणा
मज अनुभवुं दे या सुखक्षणां !
फिरुन पहांटे डोंगरमाथा
घ्यावे काजू येतिल हाता
किंवा पोफळी शिंपुनि दमतां
मज आलिंगूं दे रविकिरणां.
वझऱ्यावरती न्हाउनि पाणी
गावीं मीं कुणबाऊ गाणीं
पोवळींतुनी पेज पिऊनी
झोंपुनी जरा सुखवुं दे मना.
निसर्ग-गो-वत्सांशिं रमावें
दिवसभरी श्रम करित रहावें
तिखट कढीनें जेवुनि घ्यावें
मासळिचा सेवित स्वाद दुणा.
पडल्या किंवा सायंकाळीं
गुंतावें भावांच्या जाळीं
वेणुस्वरांचीं काढित आळीं
मज उकलूं दे आंतील खुणा.
रेन्देराचें ऐकत गान
भानहीन मज मोडुनि मान

## जीवन-संगीत

चुडतांच्या शेजेवर पडुन
भोगुं दे मूक निस्तब्धपणा.
रात्रीं समईशीं वाचावी
ज्ञानेशाची अमृत-ओवी
कविता-स्नेहें वात जळावी
उजळीत मनाचा द्वैतपणा.
कुळागराची गर्द साउली
त्यांतच माझी खोप सानुली
निद्रेविण स्वप्नांच्या ओळी
रेखीत भोगुं दे सरळपणा.
फूलपांखरें अनंत माझीं
बनुनी, मीं सेवावीं ताजीं
हृत्सुमनें आनंदामाजी
नाचवीत पांथांच्या नयनां.

बोरी, १९३२.

# इतुक्या लौकर येइं न मरणा

[ जाति—नववधू. गांधारसारंग—केरवा ]

इतुक्या लौकर येइं न मरणा
मज अनुभवुं दे या सुखक्षणां !
फिरुन पहांटे डोंगरमाथा
घ्यावे काजू येतिल हाता
किंवा पोफळी शिंपुनि दमतां
मज आलिंगूं दे रविकिरणां.
वझऱ्यावरती न्हाउनि पाणी
गावीं मीं कुणबाऊ गाणीं
पोवळींतुनी पेज पिऊनी
झोंपुनी जरा सुखवुं दे मना.
निसर्ग-गो-वत्सांशिं रमावें
दिवसभरी श्रम करित रहावें
तिखट कढीनें जेवुनि घ्यावें
मासळिचा सेवित स्वाद दुणा.
पडल्या किंवा सायंकाळीं
गुंतावें भावांच्या जाळीं
वेणुस्वरांचीं काढित आळीं
मज उकलूं दे आंतील खुणा.
रेन्देराचें ऐकत गान
भानहीन मज मोडुनि मान

चुडतांच्या शेजेवर पडुन
भोगुं दे मूक निस्तब्धपणा.
रात्रीं समईशीं वाचावी
ज्ञानेशाची अमृत-ओवी
कविता-स्नेहें वात जळावी
उजळीत मनाचा द्वैतपणा.
कुळागराची गर्द साउली
त्यांतच माझी खोप सानुली
निद्रेविण स्वप्नांच्या ओळी
रेखीत भोगुं दे सरळपणा.
फूलपांखरें अनंत माझीं
बनुनी, मीं सेवावीं तार्जी
हृत्सुमनें आनंदामाजी
नाचवीत पांथांच्या नयनां.

बोरी, १९३२.

## अमृतघट

[ जाति—नववधू. राग केदार ]

अमृतघट भरले तुझ्या घरीं
कां वणवण फिरसी बाजारीं ?
प्रेम तव गड्या मनीं दाटुनी
नेत्र प्रियेचे आले भरुनी
गहन जहाली भंवतीं रजनी
घाईंत तमीं कां जाशि तरी ?
मोत्या इवला, मनी सानुली
कुशींत कवळुनि त्यांना बसली
प्रेमें किति तव राजसबाळी
हें बघुनि कधीं रमलास उरीं ?
वडील वाचिति गाथा पोथी
काल तिथें तूं रमिलास किती ?
किंवा आई वळिते वाती
वदलास तिजशिं कधिं ऊरभरी ?
पाडस घरचें कितिदां आलें
गळा करुनि वर तुला बिलगलें !
गोंजारुनि त्या कधिं खाजविलें ?
कधिं दलें दिलिंस त्या घांसभरी ?
पडे चांदणें चौपाशीवर
भंवतीं घेउनियां सगळें घर

वांटिलेंस त्या केव्हां अडसर
तूं पीत, गात मोकळ्या स्वरीं ?
तूं हंससी उपहासें, तरुणा !
यात्रेकरुनां, कस्तुरिहरिणां
आणि बांधिसी काय शहाण्या
घर मोडुनि मांडव तयावरी ?

बोरी, १३-३-३४.

# अमृतघट

[ जाति—नववधू. राग केदार ]

अमृतघट भरले तुझ्या घरीं
कां वणवण फिरसी बाजारीं ?
प्रेम तव गड्या मनीं दाटुनी
नेत्र प्रियेचे आले भरुनी
गहन जहाली भंवतीं रजनी
घाईंत तमीं कां जाशि तरी ?
मोत्या इवला, मनी सानुली
कुशींत कवळुनि त्यांना बसली
प्रेमें किति तव राजसबाळी
हें बघुनि कधीं रमलास उरीं ?
वडील वाचिति गाथा पोथी
काल तिथें तूं रमिलास किती ?
किंवा आई वळिते वाती
वदलास तिजशिं कधिं ऊरभरी ?
पाडस घरचें कितिदां आलें
गळा करुनि वर तुला बिलगलें !
गोंजारुनि त्या कधिं खाजविलें ?
कधिं दलें दिलिंस त्या घांसभरी ?
पडे चांदणें चौपाशीवर
भंवतीं घेउनियां सगळें घर

वांटिलेंस त्या केव्हां अडसर
तूं पीत, गात मोकळ्या स्वरीं ?
तूं हंससी उपहासें, तरुणा !
यात्रेकरुनां, कस्तुरिहरिणां
आणि बांधिसी काय शहाण्या
घर मोडुनि मांडव तयावरी ?

बोरी, १३-३-३४.

---

## ऐक्यगान

[ जाति–शुभवदना–भूप ]

ऐक ! ऐक ! ऐक्य तुझें तुजसि साद घाली.
बघ त्याचें तंतुजाल तव सभोंवतालीं.

तनु क्षणभंगुर पणती
ऐक्य त्यांत दिव्य ज्योति
स्पर्शक्षणिं धूलिकणीं दिव्यता उदेली.

विश्व हें अनंत गान
जीवन तव एक तान
अनुभवी तदीय स्थान, रंग भावजालीं.

एक रश्मि विविध रंगिं
एकच जल हृत्तरंगिं
एकच स्वर पालटून या अनंत चाली.

हें सकलानंदधाम
शांति हीच हा विराम
ध्यानविमुख ज्या क्षणिं तूं सिद्ध मेघ भालीं.

जे जे क्षणिं प्रेम मोद
भोग वा मनोविनोद
रोमरोमिं ऐक्य तेंच तुजसि साद घाली.

पणजी, ६-३३.

## सांजवेळ

[ छंद—ओवी सोहा कानडा ]

सूर्य गेला देशांतरा आणि दिशा अंधुकली
पंख दमल्या पक्ष्यांचीं भिरीं घरा परतलीं.
नभाचिया नुरेवर रंग विटुनी उल्हासी,
त्याचा गाभा गढूळला स्पष्ट दिसे कासाविशी.
तरुगिरींचिया ओळी कुणी फांसल्याशा वाटे,
तप्त सांवळ्या भूमीचा कोंडलेला श्वास सुटे.
श्रान्त कोलाहल टाकी वायुचिया स्कंधीं मान
सिंधुतीरीं घ्यावयाला सांजवेळ-समाधान.
सांध्यजळ व्याकुळलें तम पाहुनी गहन
चुळबुळे, खळबळे भाव होईना सहन.
भव्य नौकांतले दीप स्तब्ध सावधान झाले,
त्यांस देखुनी जळाचें खिन्न काळीज हाललें.
तेजोरेषा थरारल्या त्याच परी काळजांत
आणि तया पाहुनीयां दीप जहाले स्तिमित
दूर कुठूनसा आला गूढ घंटारव कानीं
मंत्रमुग्ध माझी वृत्ती मुकें मन, मुकी वाणी.

पणजी, १३-१-३३.

# दवरणें.

[ जाति–भूपति. कालिंगडा ]

कधिं कधीं वाटतें दूर कुठेंतरि जावें
विसरुनी जगाला मालक अपुला व्हावें.

नी विश्ववहीचीं गळलीं मळलीं पानें
वाचुनी दुखावें विपण्ण आनंदानें.

होउनी असें मी पायांमागुनि गेलों
बहु उजाड माळावरी पोंचतां दमलों.

मीं सभोंवार जों श्रांत फिरविली दृष्टि
मज दिसली तेथें थकली सुकली सृष्टि.

फुरशासम मधुनी एकच पाउलवाट
वळकांडीं घेउनि होती दूरच जात !

जिवजिवार तेथें मुळीं फिरकली नाहीं
भीतिनें न घेती अंगहि झाडें कांहीं.

या अशा अभागी उदासवाण्या जागीं
कुणि एक दवरणें बसलें शांत विरागी.

तें कल्प कितीतरि थिजुनि भाजलें भिजलें
काळाचे त्यावर कितिक कुंचले फिरले.

किति सिणल्या पांथें त्यावर अपुलीं ओझीं
ठेवुनी कळिवरें केलीं क्षणभर ताजीं.

परि मला न त्याचें कोणी कथिलें नांव
या जगीं अशांना असेल केवीं भाव !

त्यावरती नव्हती संख्या सत्कृत्यांची
ती होती भाषा दगडांच्या हृदयाची !

मीं कैक दिसांचें हृदयावरचें ओझें
ठेवुनि मन केलें उघडें, हलकें माझें.

आंसवें तसतर ढाळियलीं त्यावरती
वदलों त्या " हो मज ध्येयपथीं सांगाती "

मज माणुसकीची दिली तयें जाणीव
नी प्रथमच आली माझी मजला कींव !

पणजी, १३–१२–३४.

# मुशाफिरा !

[ जाति—वांसरी. भैरवी—दादरा. ]

चालसी किती जगें किती युगें मुशाफिरा ?
एकटेपणा तुझा असह्य हो चराचरा !
सांज दाटली शिरीं
परतलीं घरा भिरीं
सांवळया रुखावळींत धूर मात्र कांपरा.
स्तब्ध मार्ग तांबडा
वळत जाय वांकडा
मोडक्या पुलाकडून तार जाय बंदरा.
काळवंडलीं जळें
चिंचही न सळसळे
वाटतें भयाण सर्व ! सलत आंत कातरा.
आसपास ना कुणी
भय भरे उगी मनीं
एक रात्र होउं या परस्परांस आसरा.
या इथें वडातळीं
पाय टाकुनी जळीं
जागुनी वदूं कितीक काल गुंफुनी करां.
शीणभाग घालवूं
अन् विकल्प मालवूं
प्रीतिची निगूढता निशांत आणुं या भरा.
आपुले झरे मुके
करुं जुळून बोलके
गात गात विस्तरून भेट देउं सागरा.

बोरी, १८–४–३४.

# तुझी माझी प्रीत.

[ लावणी ]

तुझी माझी ग प्रीत साजणी चांदण्यांतली लावणी ग
किती अशीं हीं फुलं गुंफायचीं मनांत फुलला मळाच ग
किती करांना शीण द्यायचा, हार तयांचा कोवळाच ग
शराबींत ना मजा माधुरी ओठांचा पेला ओठाला ग
गार वाहुं देत वारे सभंवतीं काळजाची ऊब काळजाला ग
झेल घेउं या निर्धास्तपणें दैवाच्या दोल्यावर ग
जरा कुठं धडधडलं जर उरिं रेल जिवावर सत्वर ग
कल्पकल्पवर विलास करुनी लाटांवर करूं प्रवास ग
फेनापरि दशदिशांस उधळूं हृत्सुमनांचा सुवास ग

द. क्र. ............

# आणि मज माउलीच जाहली

[ जाति—जलवाहिनी ]

कोमल बिल्वदलांवर हिरव्या, धवल जाइचा सर
तशी ही निद्रावश सुंदर
बालकवींची विमुग्ध प्रतिभा, निश्चल मंदाकिनी
तशी ही शांत विमल मोहिनी
अरुण हिच्या गालांवर, हृदयीं सूर्यबिंब रंगलें
तनूवर वस्त्र अभ्र पसरलें
ही वासंतिक उषासुंदरी हिमनगदेशांतली
आपुल्या स्वप्नांतच रंगली
जीवनगंधीं हिच्या वाहतें कल्पांचें गायन
जयावर स्मृतिचें संमोहन

ही उषा जगाची भुवनीं मम उगवली
कीं सदेह शारद वैणिक श्वसनावली !
कीं भावातीता पराच सुखसाउली !
पार्थिवतेच्या क्षितिजापुढती जाउनि ही राहिली
आणि मज माउलीच जाहली.

पणजी, ३०–६–३२.

# गेलें भिउनि मनांत !

[ जाति—चंद्रकांत. मिश्र पिलू—केरवा ]

सखे मी गेलें भिउनि मनांत !—
कळंजलें मन स्थिरचर जीवन गहिऱ्या अंधारांत.
निष्ठुर वारा उखडि तणारा वात न ठेवि घरांत.
दगडफेंकिपरि सणसणल्या सरि, चमके वीज पुढ्यांत !
घरे पाडिती रातकिड्यांचे भेसुर रव हृदयांत !
नाथांविण मी होतें एकटि भरल्या संसारांत.
दूर देखिला पिंपळ नटला अगणित खद्योतांत.
नकळे कोठुनि तोंच दाटला दरवळ निमिषार्धांत !
प्रीतीचा मधुवेल मोगरा फुलला गऽ परसांत !
गेलें धांवुनि दारीं पडलें प्रभुच्या करपाशांत !

पणजी, १४–७–३४.

# वारुणी रात

[ जाति–साकी ]

पलीकडे शेतांत तुंबलें काळें काळें पाणी
वैभव अपुलें पसरुनि त्यावर बसली कमलाराणी.
मानेवरती मान टाकुनी शीतल शेजेवरती
अंगलगीच्या उबेंत कमळें सगळीं पेंगत होतीं.
दूर कडेला बाग केळिची उगीच आनंदून
पानोपानीं यौवन–कांती दे हांसत उधळून.
न कळे वारा केविं कांपरा वेळूच्या पुंजांत
शीळ घालितो कवण हेतुनें प्रेमिक जणुं कुंजांत.
सांज संपुनी नीळ नभींची प्रेमें दाटत होती
वंशतरूंना भरुनि शिरशिरी थरथरली क्षण पाती.
सुखावुनी पाण्यांत बैसलीं डोळे मिचकावीत
काळीं ढोरें, जवळ चिऱ्यांवर धनगर हलके घेत.
बांधावरच्या माडावरची नुतरे अजुनी "सूर"
वातावरणीं वाढत होते तों "मांड्याचे" सूर
पलीकडे देवळांत वाजत होती मधुनी घंटा
भुरभुरला तों कुण्या जिवाचा आठवणींचा सांठा.
माडामध्यें खोंप, तींतही जळे कुणाची भाटी
पिउनी घे कुळवाडी तेथें दारू करटी वाटी !
अर्धे लुंबल्या अर्धे मळल्या अफाट त्या शेतांत
मळणी करिती पाय कुणाचे, लुवणी आणिक हात.

दणकट त्याचा उघडा करडा लवलवणारा देह
मूर्तिमन्त तो स्त्रीहृदयाचा अतिसुखदायी मोह !
नजर तियेची आगें-मागें विळा परी शेतांत
बघतां त्यातें वाटे कीं तो शिरलासे पोटांत !
भोंवतालच्या सृष्टीहुनिया सुंदर अंतःसृष्टी
हावरेपणें पहात होती त्याची मिटली दृष्टी
म्हणे मनीं तो " घरास जातां कोंडिन मी खोपींत–
गोड गुदगुल्या करणारी ही रम्य वारुणी रात. "

नारवें, ६-३-३४.

# पारिजात

[ जाति—चंद्रकांत. ]

"हट्ट तुझा बेहद्द पाहुनी अभिमानी भामिनी
गोड तुझ्या रुसव्यांत हरवलें मन माझें रंगुनी.
स्वर्गांतिल प्राजक्ताहुनियां दुर्लभ चेतोहर
प्रीतीचा पारिजात तुजला दिधला मीं सत्वर.
श्रीकृष्णानें दिधला भामे स्वर्गांतुनि आणुनी
हृदय-वनांतिल परी ठेविला तिला सदा चोरुनी."
"नाथ! दिल्वरा! मीच शिंपितें तो हो रात्रंदिनीं
फुलें तयाचीं तरी सांडती कवितेच्या अंगणीं
अशीच होती माझ्यासरसी भामेचीही गती
रुक्मिणिचा परि भलता मत्सर तिनें न केला किती!
श्रीकृष्णाशीं कधीं न वदली भामा रागाविणें
मी दारीं हांसतें, स्वारिचें तिजशीं जरि बोलणें"

९–१–३४.

# सायुज्यमुक्ति

[ जाति–नववधू–राग दुर्गा. ]

तूं प्रेमिक मी तव प्रियकरिणी
तुज आळवितां गेलें फुलुनी !

प्रभातरवि तूं मी नव कमलिनि
शीतल शय्या किति तुजवांचुनि
वायु तशांतहि भलतें वदुनी
करि असह गुदगुल्या फिरफिरुनी !

तव ऊबेस्तव तनु शिणशिणते
येतां जवळी परि बावरतें
लाज गुलाबी किति शिरशिरते !
हो असह्य ! ये पाकळि उलुनी.

सोन्याच्या तव हृदयीं पोहुनि
मन रे माझें गेलें हुरळुनि
तुझ्यांत गेलें विश्व लोपुनी
मज तुजविण कांहिं न ये दिसुनी.

स्पर्शे तव, मम हृदय थरथरे
बिंब तुझें आंतुनी झुरझुरे
गोड विश्व हें, मधु जीवन रे !
धर अशीच मज नित आवळुनी.

दृढालिंगनीं तुझ्या मरावें
प्रतिकिरणीं तव मिसळुनि जावें
प्रणयाच्या ज्योतींत जळावें
क्षण एक योग परि अनुभवुनी.

म्हापसें, २६–२–३२.

---

# क्षणभंगुर जरि जीवन

[ जाति–घनराई ]

क्षणभंगुर जरि जीवन सखे सुखसुंदर करुं आपण
सखे गऽ शाश्वत करुं आपण.
मृदु मादक मुखचुंबनें
दृढ निर्दय आलिंगनें
जन म्हणो चिखल, शुभमंगल कमलें उमलवुं या त्यांतुन.
जन अंजन नयनीं भरो
तम गगनभरी विस्तरो
शुभ बकुलफुलीं तेथल्या सजवुं या सुखशय्या आपण.
मृदु स्वप्नांची लोंकर
करि भुरुभुरु वाऱ्यावर
धर, दुशाल जरिची विणूं हिमांतरिं वसंतसुखसाधन.
करुं गोड कुशींतच निशा
उतरवूं जगाच्या विषा
चल मुलांफुलांमधिं उषा फुलवुनी विकासवूं जीवन
सखे गऽ प्रकाशवूं जीवन.

बोरीं, १–१–३६.

# सागरा

[ जाति–मोहिनी ]

सागरा ! हिरा मम नेला कोणत्या ठिकाणीं ?
निळ्या ओळिपैलीकडचें भाग्य दाखवोनी.
अजुनि दुखी सरली नाहीं प्रीतिच्या मिठीची
मूर्ति प्रेमलाची उमदी ना हले दिठींची
दीसरात अंतर कोरी तीव्रता शिटीची
भिजत वाळुसम का जावें मी असें झुरोनी ?–
पाचव्या निळ्या तव फुटती कातळांत लाटा
धांव घेइ वाटे कांठा प्रीतिचाच वांटा
आणि क्षणीं दुसऱ्या येई भीतिचा किंवाटा
काय जीवनीं आणिसि या आंसवें भरोनी ?–
ओढतात रांपण कोळी गात काळरातीं
उजळ मासळी तडफडते, माड गाजताती
जाळ लाल भडके मधुनी, साउल्या सभोंतीं
निष्ठुरा ! प्रतिक्षणिं टाकिसि हृदय कां चिरोनी ?–
काजळून अधिकचि जाई क्रूस व्योमभागीं
अकस्मात दचकुनि भुंके श्वान आडमार्गीं !
दुष्ट अंतरींचीं स्वप्नें मारितात नांगी !
जितेपणीं जावें का मीं जळुनिया मरोनी ?–

## फसवणूक

[ जाति—चंद्रकांत ]

प्रेम तिचें जरि होतें मजवर, मी माझा नव्हतों,
वाटत होतें तिला परी मी आनंदें जगतों.

मलाहि होती जरी हवी ती, घडि होती टळली
प्रीती होती परस्परांना उशिरां बहु कळली !

हांसत खेळत बोलत होतों आम्ही दिवसभरी
खडकांवरती जणूं फुटाव्या काजळि जळलहरी.

सावरुनी मज तारेवरती दिवसा वावरतों,
रात्र पसरतां न कळे का मी उगीच तळमळतों,

सुखी जगाला भासवुनी किति जीव जगीं जगती
फसवणूक ही पसरुनि भंवतीं उरांत तगमगती !

मुंबई, ११–३–३६.

# हिमालयास

[ वृत्त—शार्दूलविक्रीडित ]

तू आहेस मदीय मातृनिटिलीं रेषा सुरम्योज्ज्वल
हस्तें श्रीविधिनें सहर्ष लिहिली सौवर्ण मुक्तावळ.
केलीं कैक सुखाभिषिक्त शतकें एका जिच्या अक्षर
झाली काय फिकी जिला वहियलें वास्तव्य विश्वेश्वरें ?
उंचावून न पावल्या तुजकडे ज्वाला स्वयज्ञाचिया ?
केवीं ये नच रक्तिमा तव मुखीं, हा रोष गा कासया ?
आंचीनें कधिं या स्वयें वितळुनी निस्पंद वाहाशिल ?
अंतर्बाह्य तनू समग्र अमुच्या केव्हां भरा येतिल ?
केव्हां पाठविशील विस्मृत भल्या गेल्या दिसांचे ध्वनि
शास्त्रें मंत्र कथा पुनश्च सगळें भांडार धुंडाळुनी ?
दातृत्वें अजुनीहि थोर बहु हो मन्मातृभूकारणीं
तुझें वैभव तेज ओज सगळें आसेतु विस्तारुनी.
दे प्रज्ञेस विशालता, विमलता देहा, द्युती कल्पने
दे सामर्थ्य करां, रसत्व रसने, दे भव्यता भावने
दे शांती हृदया, प्रसन्नमयता पूर्णत्व-आरोहणीं
केव्हां सुंदरता तुझी प्रतिपलीं वर्धिष्णु पाहीन मी ?
पाहूं ना शकलों तुला हिमरुपीं देवा नगेंद्रा जरी
समृद्धींत सुखें बघेन अमुच्या सप्रेम केव्हांतरी !

मडगांव, १९–५–३४.

# विशाल भारत

[ जाति–हरिभगिनी ]

विराट तरुवर नटवर शंकर हे अजरामर महाकवे !
युगांयुगांचे नाचव पानीं अनंत सुंदर रंग नवे.

कालोदरिंचीं खात आंतडीं पसरीं पाळें पाताळीं
तद्गत विष करिं अमृत संतत हात विस्तरीं आभाळीं.

व्यासदृष्टिनें ग्रास करीं क्षणिं सगळ्या भुवनांगगनांचा
सकल पटांचा न्यास करुनि घे ठाव निरंजन रूपाचा.

अवतारांची सकल मालिका विविधपणा जेथें विसरे
आणि मुक्तता प्रतिपाळिं जेथें सुंदरतर रूपें विचरे.
तेज तिथें हो स्निग्ध मधुरतर, लय पावुनिया पीत रहा
रोमांचांचे अंकुर अंकीं सहजचि फुटतिल लाख दहा.
पानोपानीं भविष्यकलिका फुलतिल तव मृदु स्मितासवें
गंधें त्यांच्या सहज जवळतिल गंधर्वांचे सकळ थवे.
योगबळें तव होतिल सुमनें ज्या काळीं परिपक्व फळें
रूप-रंग-रस-परिमळ-निर्भर खळखळतिल आनंदजळें.
अमरां पितरां यक्षकिन्नरां मधुदानें संतुष्ट करीं
तन्मुख-चुंबित बीजें झडतिल, पुनश्च उठतिल तुझ्यापरी.
रात्रभरी मज अशी जागवी अखंड ही तव सळसळ गा
स्कंधीं ग्रहगण तुझ्या काजवे दिसति न ते जरि आज जगा.

पणजी, ७–१२–३५.

## हुषार भाई !

[ वृत्त—पादाकुलक

हुषार भाई, हुषार भाई !
हांकेवर ये भाग्य आमुचें
लवाजम्यानें वाजत गाजत.
पुरुषार्थांचीं शस्त्रें वस्त्रें
चढवुनि व्हा रे सज्ज शिपाई.
क्रांतीचा जयघोष करा रे
आणि पुकारा संगर यात्रा.
हे अंड्यांतिल महाकवींनो !
कवच्यामध्यें खुपसुनि माना
कुशीउशीचा घेत उबारा
शतकें किति पहुडाल किड्यांपरि ?
उत्प्लवनें पहिल्याच गड्यांनो
स्वर-पंखांच्या संचाराला
उणीं करा रे भुवनें गगनें.
शिंगें कर्णे झांज नगारे
रणवाद्यें या फुंकित बडवित
भैरव तांडव करा देशभर
हर हर हर सावेश गर्जुनी
रुद्र करा भारतभर जागा !
विशाल तुमचीं सोज्ज्वल हृदयें
धाडधाड लागोत जळाया.

त्या ज्वालांच्या तालावरती
कंठ फुटे तों गा रे गाणीं !
ज्या गाण्याच्या स्पर्शासरसें
मेल्या रक्ता उकळ्या फुटतिल
तिसरा डोळा होउनि उघडा
अज्ञाता लागेल गिळाया,
बुद्धीच्या तुटतील श्रृंखला
खुल्या मनाच्या होतिल खाणी
गुप्त सकलही भुजा प्रगटतिल
भास्कर-तेजाशीं झुंजाया.
अस्थिपंजरीं प्राण न मावुन
बघेल त्रिभुवन व्यापायाला.
यास्तव संजीवक प्रतिभेचा
अखंड मंगल सेक करुनिया
करा भीमबलि सगळी सेना !
नव्या युगाचे सैनिक या हो
घरांत मुडदे कुसती त्यांचे
दहन-दफन उरकुनि घ्या आधीं.
पितरांच्या प्रेतांस कवळुनी
निष्क्रिय जे मुळमुळत बैसले
हाणा त्यांच्या कंबरिं लाथा
नी आणा त्यां शुद्धीवरती !

## जीवन-संगीत

जुन्या काळच्या इमारती ज्या
आज जिवाला धोका झाल्या
त्या हाणुनिया पाडा सत्वर.
प्रकाश-वारा आंत शिरूं द्या
ज्याला तुमचे पूर्वज भ्याले.
काळाच्या टिचकीला टिकले.
जे जे सुदृढ चिरे तयांचे
तुंग उभारूं स्तंभ मनोरे !
आज असा विध्वंस मांडुनी
उद्यां करूं मांडावळ नूतन.
चार भिंतिच्या कुंपणांत जें
सरड्यासरसें प्रेम आपुलें
रंग पालटित नाचत उरलें
मुक्त करा रे सत्वर त्याला
उल्हासें आसेतु हिमाचल
गुढी घेउनी नाचायाला.
सगळी सृष्टी, हिंदसमष्टी,
एकच अथवा जिवलग व्यष्टी
जीवें भावें कुणावरी तरि
प्रीतीची अतिवृष्टि करा रे.
प्रेमाचें साकार सानुलें
रूप जरी रे मनुजदेहधर

तिलांजली द्या सर्वस्वावर
आणि दृष्टिचें तेज वाढवा
विराट तेजें प्रगटुनि दाविल
विश्वरूप दर्शनें तुम्हाला.

बोरी, १०-१०-३५

# यापुढें

[ जाति—नृपममता ]

यापुढें संपली नीज
ती काळरात अंधारी—यापुढें
पूर्वेस अरुण रक्ताचा
द्युतिवृष्टि दिव्य संसारीं—यापुढें
स्फूर्तिचे नाचरे वारे
सुटतील दिशांतुनि चारी—यापुढें
मोकळे, द्विजांचे गळे, नभोमंडळें
व्यापितिल सारीं
स्वरकंप भरेल शरीरीं—यापुढें.
जागेल अंतरीं देव
त्यागुनी शिळांच्या राशी—यापुढें
वेढितील नच धर्माला
तट भिंती आणिक वेशी—यापुढें
कृति मिरवित नेइल झेंडे
सन्मानें देशोदेशीं—यापुढें
रोकडे, होउनी खडे, सुधेचे घडे
देउं दुबळ्यांसी
विष खावुनि ग्रासोग्रासीं—यापुढें
लाभेल जयाचें त्याला
भरपूर विनातक्रार—यापुढें

साहील न अवमानाचा
कोणीही कसला वार—यापुढें
शिर उन्नत करुनी जगणें
होईल हाच आचार—यापुढें
होईल प्रीति हा योग, त्याग हा भोग
सत्य आधार
स्वातंत्र्य हाच शृंगार—यापुढें
हातांत जगाच्या हात
घालुनीच आम्हीं चालूं—यापुढें
पत इभ्रत त्याची अमुची
अध्यात्मबळें सांभाळूं—यापुढें
जडतेला पंख फुटावे
कळवळुनी म्हणुनी बोलूं—यापुढें
अंतरीं, लावितां सुरी, झरे जी सरी
तिचें जल गाळूं
ती आग आजची जाळूं—यापुढें.

म्हापसें, १९३४.

## सुहृदास

[ जाति—नववधू ]

वर्षांत तव शिरीं वर्षफुलें
सहर्ष जीं यशकीर्ति परिमलें.

तव वदनीं स्मित शरच्चंद्रिका
हृदयिं सिंचितां भरति ये सुखा
पटे तूंच जिवलग प्राणसखा
जग गोड वाटतें तुझ्यामुळें.

मध्यरात्रिची निळी वारुणी
उदंड भरली तुझिया नयनीं
पितां, सुखें मन विव्हल होउनि
माझेपण तुझिया रसीं मिळे !

सरी मृगाच्या तव मृदु वचनीं
पिकतील मळे जेणें विपिनीं
गर्भ मतीचे तव तेजोमणि
जे तव एकांत-विलास-फळें.

जिथें उमटती तुझीं पाउलें
तेथ उमलती तेजःकमळें
अंधारीं तेणें पंथ कळे
गति सुगम जलदही त्याचमुळें.

अखंड वाजिव जीवनवेणू
सजीव होतिल पथिंचे रेणू

परस्परीं मीनतील अणुअणु
ब्रह्मांड उभवितिल याच वळें.
फुलती सहृदय जन तव श्वासें
वठले तरु मोहरती हास्यें
कलावन्त बहरति सहवासें
रविबलें जेविं ग्रहगण उजळे.
वंद्य तुझी मज अंतर्ज्योती
घरोघरीं जी लावी वाती
स्पर्शें करि दगडांच्या मूर्ती
संजीवक तेजाचे पुतळे.

पणजी, १३–८–३३.

# आकाशाचें मनोगत

[ जाति–मोहिनी ]

इंदुकले ! नवलाची तव हास्य जादुगारी
गाढ ढगांच्याही भाळीं ये जरी किनारी.
दिवसभरी तापुनि होतों जहालों उदासी
रंगदार स्वप्नें विरलीं हांसरीं विलासी
हिमांगिनी ! बिलगुनि बसतां तूं जरा उराशीं
हळूहळू हरली मनिंची काजळी विषारी.
होय देह ज्योतिर्मय हा कांतिनें तुझ्या गे
गतस्मृती त्वत्प्रीतीनें धुंदल्या शुभांगे.
प्रीतियोग दिव्य विरागी त्यांत जीव जागे
सांद्र नीलिमा श्रीहरिचा दाटला शरीरीं.
संगमस्मृती तव झाल्या तारका मनीं या
तुझ्या वियोगीं लागति त्या अधिकची खुलाया
आणि धीर येई हृदया काळघोट घ्याया
तूं रहस्य, या जीवींची चित्कला दुपारी.

पणजी, ८–२–३४.

# कवण तूं

[ जाति—कंचनी ]

कवण तूं सुरतरसाची गंगा
भुलवुनी भारिसि हृदय-अनंगा
हांसुनी उधळिसी अष्टदिशा रसरंगा.
कोवळे सधन मनांचे मळे
कवींचे अर्धोन्मीलित गळे
फिरवुनी दृष्ट तूं करिसि खुले मोकळे.
कुणा दे पुरुषार्थाची आशा
कुणाला पार्थिव नव अभिलाषा
आणखी कुणाला भव्योदात्त निराशा.
पावसी भावापरि भक्ताला
प्रकाशें रेखिसि अदृष्टाला
ही तेजस्विनि ! तव सुंदरतेची लीला.
अभिनयीं मूक मनांचीं गाणीं
हिमांकित वासंतिक नटराणी
वाणींत झुळझुळे मधुर झऱ्याचें पाणी.
मूस कीं मूर्तचि पंचकलांची
कूस वा सकलहि ग्रहताऱ्यांची
तूं सतनु चिन्मया प्राणवायुची वीची.
वीजशी आलिस कोठुनि गेहीं
रोपनी केलिस स्पर्शें देहीं
फुलविली माझिया सुखासुखीं नवलाई.

बोरी, २८–१०–३५.

# कारागीर

[ जाति—नववधू कालिंगडा ]

तव परिस-हृदय लागुनि सजणा
मज सहजचि आला स्वर्णपणा
तव स्पर्शाचें मधुर निबंधन
स्वातंत्र्याचें हरी कृपणपण
शीतल तेजें भरि तनु कणकण
सुख झरे भरे उर क्षणक्षणां
अनंत वाद्यांचा स्वरसंचय
झाला अजवर मज कंटकमय
साधियली त्यांतिल अक्षय लय
स्वर मिळे नवा जीवनकवना.
नाद, रंग, रज, अभिनय, अक्षर
त्यांत तूंच सत्, सुंदर, शंकर
नटेश तूं स्वानंददिवाकर
तूं फुलविलेंस आंतिल अरुणा.
तव अधरांची पिउनी जोडी
कळली मज मम अनुपम गोडी
सीमा विश्वाची हो थोडी
मग कोण पुसे वस्त्राभरणा ?
तूं जीवाचें केलें सोनें
कलाकुसर कर क्षणिं अंगुलिनें
तव कंठींचें करि मज लेणें
तूं कारागिर माझा रमणा.

पणजी, ४–१–३३.

# तीन सांजा

[ गझल. वृत्त–पांडव ]

तीन सांजा जाहल्या मी वावरें आंतून कां ?
जीवघेणी वाजवीसी वेणुची कां गीतिका ?
वाटकी रे प्रेमगाणीं छंद जीवा लाविती
बद्ध पाशीं रेशमाच्या जाहलें मी मालका.
छेडिसी कां बांसरी रे बैसुनी वातायनीं ?
देति ठेका–मानसींही त्वत्पदींच्या पादुका.
मत्करींची–मन्मनींची वात कंपे साजणा
बांसरीच्या–त्वन्मुखाच्या सोसवेना रे सुखा.
चोरचालीं रात येई मंदिरीं, हृन्मंदिरीं
जीव हा सारा फुले, सांडे उरीं रे चंद्रिका.
लावितां कुंकू सख्या रे अंगणीं वृंदावना
नेत्र हे हा जीवही पाहूं बघे तूतेंच कां ?
सूर जे तूं काढिसी आंदोलतें मन त्यांवरी
वाहतें श्वासीं तुझ्या तें देतसे टाळ्याच का ?
सोसवेना यापुढें रे सुस्वरांच्या टांचण्या
लागुनी मी विव्हळावें ही तुझी इच्छाच का ?
" रातवेळीं वेणुनादें नाग येई मोहुनी—
–माय बोले, हांससी तूं—हें तुला समजे न का ? "
" रातवेळीं वेणुनादें नाग येई मोहुनी "
मी म्हणें, म्हणसी परी तूं " वृद्ध ती तूं बालिका "

बोरी, १९३१.

## विरोधी भक्ति

[ जाति–लवंगलता–ललत–त्रिताल. ]

निष्ठुर किति हृषिकेशी ? रे तूं
जपतां वरि वरि
येशि लपुनि घरिं
गुपितें चोरुनि नेशी रे तूं
दोष अमित तव
गणितां मम जिव
हलके चित्त हरीसी रे तूं
तुजशिं अबोला
धरितां मजला
भलती जवळिक करिशी रे तूं
ढकलितां तुशी
अधिक बिलगशी
शिथिल तनू ही करिसी रे तूं
दुरावितां तुज
सुस्वर हितगुज
घालुनि ओढुनि घेशी रे तूं
तुझ्यावरुनि मन
विसरवितां क्षण
अधिकचि घरचा होशी रे तूं
तुला चुकवुनी
रमतां स्नानीं
लुगडें चोरुनि नेशी रे तूं

दार लावितां
तुला अनंता
तवपर्णि मंदिर भरसी रे तूं
दीप शमवितां
नयनहि मिटितां
मनीं प्रकाशुनि हंसशी रे तूं

पणजी, २७–९–३२

—०—

## संधिकाल

[ जाति—चंद्रकांत ]

परसांतिल आंबा बघ आला फळभारें रंगा
चपळ चानिया धांवत तुरतुर झटती सर्वांगा.
वासंतिक धुंदी घोटाळे अजुनी पानांत
कोकिल-कूजित मंजुळ घुमतें अजुनी कानांत.
आठवणींच्या चित्रांचा शिरिं हिरवा संभार
मावळता रवि उधळी त्यावर कांचन-भांडार
आणिक खालीं गाढ पसरली छायांची जाळी
येइ श्यामले, बसूं घडीभर बोलत या काळीं.
एकांतांतिल गोड करूं या ही रक्तिम घटका
माधुर्यांचा भार फळांचा अधरें करूं हलका
याच फळांपरि रसाळ मोहक माझेही शब्द
ओठांनीं तूं कां नच करिसी मग त्यांचा भेद ?
चपळ पिसोळीं चतुर चोरटीं भुरभुरती जवळी
सावध ! सजणी, नेतिल अमुचीं कानगुजें सगळीं
चावट ! उष्टी शीर मुखीं मम घालुनिया अर्धी
दीस गिमाचे असुनि गडे कां करिसी तूं गर्दी ?

मडगांव, २१–४–३५.

## प्रणयमुग्धेस

[ जाति–रसना ]

नादांत गुंगसी जें शब्दांत सांग बाले–
आषाढच्या घनें कां त्वन्नेत्र भारलेले ?
होसी रसार्द्र केवीं झुकतेस द्राक्षवेली ?
ओठांत वेदनेची मदिराहि सांठलेली ?
पायांस अंतराचा कां भार साहवेना ?
कां बोल घोळलेला ओठांतुनी सुटेना ?
कां सावलींत तूझ्या बघतेस बावरून ?
भलतीच लाज मेली वद गे सखे त्यजून.
घे शेत हेलकावे तव कां विळी न चाले ?
नादांत गुंगसी जें शब्दांत सांग बाले.

मुंबई, १३–१२–३०.

## गोड कळ

परलोकींही दुर्मिळ साजणा अंतरंगींची कळ.
सल नाजुक सलतां मनीं
येतात स्मृति वहरुनी !
क्षण वाटे जीवन सायंकालिन सलील उज्ज्वल जळ.
तूं गुदमरविसि चुंबितां
कडकडुनी आलिंगितां
मग करितां कुडिची घडी गोड ये जीवाला भोवळ.
ढग कौलारीं कोसळे
घरिं पुरति न समई जळे
परि याच अवेळीं मिळे मला तव उबाळ वक्षस्थळ.
जग गहन सतीचें मन
सुखदुःखाचें मीलन
करि अनलमंचकीं शयन प्रणयिनी सोनसळी केवळ
मन आपुलें जळता दिवा
भिलभिले हालतां हवा
परि उजळी अवघें त्रिभुवन जरिही माथ्यावर काजळ.

बोरी, ११–५–३३.

## शेज

[ छंद—ओवी ]

कढे सिंधु टाकी वाफा नारळिका घाली वारा
माझ्या जिवा तुझा थारा.

धीर देती तारे जगा रातीचिया काळवेळे
मला सये तुझे डोळे.

कोळपल्या कातळांना लहरीचें बिंदुजळ
माझ्या चित्ता तुझे बोल.

कृष्णमेघां सोमरस अफाटल्या आकाशांत
डोळां माझ्या तुझें स्मित.

वायु कळकांच्या पुंजा सांगे नवलकहाणी
तूं मी त्याची राजाराणी.

वायुचिया तरंगाला मत्त प्राजक्तीचा वास
मला तुझा सहवास !

जलराणीचिया वक्षीं चंद्रबिंबा चढे तेज
कुठें सांग माझी शेज !

बोरी, ३०–१–३१.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे ५७६

# परिचयें प्रेम तव जाइल का ?

[ जाति–वधू ललत ]

येतां जवळी मी पळशिल का ?
फिरतां मागें मग वळशिल का ?
विखरुनि जादू तुझ्या फुलांची
भूक वाढविसि मूक जिवाची
गुंगत येतां हुंगायासी
गुलाब गे तव चुरतिल का ?
कांटे माझ्या मनिं खुपतिल का ?
भ्रमणचतुर भ्रमरांची जोडी
लावी हृदया गायनगोडी
गात पाकळी फुलवुनि सोडी
कवळुनि धरितां कोरिल का ?
भांडार आंतलें चोरिल का ?
तव हृदयीं शुक्राचा तारा
मम आत्मा जणुं प्रभात-वारा
येतां वाहाया दंवहारा
ढगांत त्याला गिळशिल का ?
मग काळिज माझें पिळशिल का ?
तव हृदयाच्या पाणभुईवर
मृदुल पदें मी फिरतां झरझर
आलें जर कधिं वादळ दुस्तर
लहरींवर झेलशील का ?

खडकांवर वा आदळशिल का ?
        स्नेह आमुचा मूकपणाचा
        कल्पनेंत आनंद मनाचा
        वास्तवांत तो जरि जायाचा
घालूं पुढती पाउल का ?
परिचयें प्रेम तव जाइल का ?

वास्को, ४-३-३१.

# माझी आगबोट

[ छंद—जलारोहण ]

माझी आगबोट चालली दर्यांत ग !
दर्यांत ग
मन धांवत तरी तव हृदयांत ग
हळुहळु पाण्यांमधीं जुनें जग बुडे
निळयाकाळया दर्यावर दैव स्वैर उडे
तुझ्या चिंतनानें दील तरी धडधडे
वर खालीं लाटेवरी हेलकावे खात ग !
पाचूवाणी जळावरी मोत्यांवाणी फेंस
खेळतांना म्हणे मातें "मोदें वाळा हांस"
पिशावाणी उदास मी एक तुझा ध्यास
पाचूवाणी नेत्रीं तुझ्या मोतीं ठाव घेत ग !
नारळीचे वृक्ष स्तब्ध प्रेमस्तंभ उभे
पर्णांआड पक्षी जणुं भाव हृदीं दबे
भरितात अश्रु हृदीं केळियेचे गबे
हेमंताचे दीस तरी हृदीं उष्ण वात ग !
आशेनें मी आकाशांत पाहियलें जधीं
तुझी प्रेमपुष्पें शुभ्र आलीं वाटे तधीं
परी हाय ! पक्षी ते ग स्वैर वाऱ्यामधीं
सान बाळापरी मज कुणी फसवीत ग !

मुंबई, १–१२–२९

## मन मार

[ जाति—नववधू ]

मन मार उगिच जें चुकचुकतें
सत्कर्म सदा उजळुनि निघतें.
अपेश हें सोपान यशाचें
शांती बालक वा क्रांतीचें
चिरंजीवनहि कटु मरणाचें
यज्ञांत तेज विलसुनि फुलतें.
एकांतुनि ये अनंत उदया
अणुनीं जीवित ब्रह्मांडा या
भंगुर पार्थिव म्हणोत काया
त्यांतही दिव्य परि धगधगतें.
नच पामर तूं, श्री परमेश्वर
विश्व अखिल तव विलासमंदिर
तुजमुळेंच तें प्रिय, शिव, सुंदर
तुजविण तें मडकेंच रितें.
तव श्वासें जग अवघें जगतें
हास्यें तव ते हंसत विकसतें
अखिल व्यापुनी तेज विलसतें
सौंदर्यप्रेम तव रसरसतें.

म्हापसें, ३१—१०—२१.

# माउलीचा खेळ

[ शार्दूलविक्रीडित ]

गेला मानव बाळ विश्वजननिशीं, तीतें पुसे " माउली !–
आलों केंविं, कुठून, कां, मज अशी काया कशी लाभली ? "
संकोचें क्षण हो विमुग्ध जननी मंदस्मिता वत्सला
साऱ्या पूर्वसुखस्मृती मग तिच्या नाचूं मनीं लागल्या.
त्याचें गुंतविण्यास चित्त सहजीं अन्याकडे तेधवां
ती बाळास वदे " प्रभातसमयीं या खेळ खेळूं नवा."
तेव्हांपासुनि नित्य पाठशिवणी त्यांची असे चालली
क्रीडामग्न सदैव बाळजननी झालीं युगें लोटलीं.
लास्यीं, दिव्य पदें तिचीं क्षण जिथें कालांतरें स्पर्शलीं,
तेथें मंगल रम्य विश्वकमलें आलीं, फुलों लागलीं.
ईर्ष्येनें किति वेंचिलें सुम तयें तद्दर्शनें हर्षुनी
नी त्या संग्रह वाढतां उमजलें, जाती न तीं संपुनी.
तो आनंदसरोवरीं विमल या केलिक्रमीं गुंतला
—प्रश्नाची फिरुनी स्मृती कधिंतरी होईल का त्याजला ?

पणजी, १९–९–३४.

# नवी भूपाळी

[ जाति—नृपममता ]

क्षितिजावर आली लाली
नयनांची नीज पळाली
कंठांत नवी भूपाळी
शुभरेषा आज कपाळीं
पळविती घरोघर चुली
इंधनांतली
काजळी काळी
शुभरेषा आज कपाळीं !
देउनी रक्त सोवळें
शिंपिती मळे
तरुण शुभकाळीं
शुभरेषा आज कपाळीं !
पाडुनी तटांचे चिरे
उभविती घरें
जगाच्या भाळीं
शुभरेषा आज कपाळीं !
जाळिती सांचला केर
धूर बाहेर
तेज राऊळीं.
शुभरेषा आज कपाळीं !

सांडलीं चिरंतन फुलें
दलित नव दलें
गुंफिती माळी.
शुभरेषा आज कपाळीं !
फुलविती निखारे, फुल
सुखें, घरकुलें
स्त्रिया गुणशाली
शुभरेषा आज कपाळीं !
वीतिचा विराट ग्रास
प्यास हृदयास
प्रीतिची झाली
शुभरेषा आज कपाळीं !
लंघुनी वैरि बंधनें
व्यापिते मनें
कृतीची चाली
शुभरेषा आज कपाळीं !
आंतला, सूर्य उगवला
मुखीं सोज्ज्वळा
प्रभेची जाळी
शुभरेषा आज कपाळीं !

म्हापसें, ५–१–३४.

ग्रंथ ११९८३ २१।५।५८

## लोकसागरा

[ वृत्त-पादाकुलक ]

लोकसागरा ! स्थिरपद कां तूं ?
स्थितिलोलुपता पाहुनिया तव
उरीं गुदमरे माझें गाणें.
असतां पोटीं खर वडवानल
मुखीं कांति कां निश्चल व्याकुल ?
विपन्नतेंतिल शालिन्याला
लाचारपणा जडतो हेतू.
जळे खळखळे जें तव पोटीं
त्याचे कढ किति कोंडुनि धरशिल ?
सजीवतेची तुझिया द्वाही
फिरवी दिक्कालाच्या वरुनी
प्रळयगर्जितें हालव वसुधा
चाळव तिचिया व्यापारांना
स्वाधिष्ठित हो ! मारुनि फुंकर
आकाशींच्या मालव टिकल्या
टक लावुनिया त्यांना न कधीं
भाग्य तुझें रे उजळायाचें
संतापाच्या तुझिया लाटा.
फुटूं देत रे दिशादिशांतुनि
देशदेशिंच्या मरुद्गणांना
तव यश ललकारित जाऊं दे !

## जीवन-संगीत

भरेल धडकी मेघापोटीं
सौदामिनि होईल हिंपुटी
मदोन्मत्त इंद्राचें तख्तहि
कोलमंडुनी पडेल खालीं.
अथांग अपरंपार मनाचा
क्षोभ कसा किति विराट सुंदर
एक वेळ जगता पाहूं दे
आणि फिरूं दे साफ बाहुली.
तव पृष्ठावर मिरवित फिरती
किती जहाजें, किती विमानें
खुशालचेंडूंच्या या सोयी
फिरवी त्यांवरुनी वरवंटा
दुबळे त्यांतिल जीव, तयांस्तव
फुरसत कोणा रडावयाला ?
युद्ध जगाशीं, युद्ध स्वताशीं
युद्ध पांचही महाभुतांशीं
चालव विश्वासानें अविरत.
प्रळ्याच्या तालावर गावें
तुफान लाटांनीं नाचावें
फिके अचानक पडतिल सारे
रंग नभींचे फसवे नटवे.
भूताच्या शिरिं नाचत मींही
अनिर्बंध तुजसवेंच गाइन

दुर्मिळ हा तव ताल लाभतां
अमरकाव्य मुडदेही गातिल.
आज घडीला, तुझ्या तडीला
राज्य पसरलें बघ शंखांचें
फुंकुनि त्यांचीं पोकळ डोकीं
दांभिक, भोळे, दुबळे प्राणी
शंखनाद करुनिया तयाला
म्हणती तव घनघोर गर्जना.
तुझी हेलना करुनी चाले
तुझ्या जिवावर जी ही चंगळ
मुकाट बघशिल किती कोठवर
क्षुब्ध, क्रुद्ध हो महासागरा !
पटव जगाला तुझ्या मनाच्या
न्यायबुद्धिची साक्ष एकदां.
पोटीं जीं तव अगणित रत्नें
वर येऊं दे चमकत त्यांना
उजळवुनी युग विसावतांना
गातिल तीं तव तेजोगीतें.

## वास्तव्य

[ जाति–श्यामाराणी. ]

वास्तव्य कुणाचें तेथ असे
त्या नांव कोणतें देउं कसें ?
        कोलाहल दिवसभरी श्रमुनी
        थडग्यांवरती घेइ विसावुनि
        शांत रात निर्झर-मर्मर-ध्वनि
यांच्यावरती कोण वसे ?
        मध्यरात जातां ओसरुनी
        वारा पडतां तनु गारठुनी
        कलिकाकोपीं, कुमारिकामनिं
हळुवारपणें कोण वसे ?
        अंध तमीं पणती मिणमिणती
        कोण वसे तज्ज्योतीभंवतीं
        महात्म्यांचिया मुद्रेवरती
निर्व्याजपणें कोण हंसे !
        निजतां गात्रें, निजतां वृत्ती
        कोण तरळतें स्वप्नांवरती
        अमर कवींच्या कवनांवरती
नाचुनि लावी कोण पिसें ?
        जेव्हां माझ्या स्मृती उजळती
        पुढचीं विश्वें नयनां दिसती
        संकटकालीं अति एकांतीं
हृदय-स्पंदनीं कोण ठसे ?

## कणव

[ चाल–महाराष्ट्र गीताची. ]

इतुक्यांतचि आणिं न तव कणव मोहरा
साहवेल केविं दान दीन पामरा ?
घालिं न आतांच मला अमित भूषणें
भारें मम होइल हें मंद चालणें
चिद्घन तूं, गोड तुझें जरिहि बोलणें
संततझड न सहे या मातिच्या घरा.
तव वीचींवरती ही नाव हालुं दे
स्वानंदें तींत जीव सहज डोलुं दे
उडुनी, स्वर्गास जों न ती स्वहस्त दे
लाटांनीं कवळुं नको पोटिं सागरा.
मागितलें जल जरि मीं तप्त होउनी
वर्षावें टाकिं न मज चिंब भिजवुनी
होइल नभ पाखरेंच पंख दाटुनी
व्याधाचा शर बसेल अचुक अंतरा.
स्वप्नीं हा बालकतरु हंसत चंवरला
पवनचुंबनांत तुझ्या जरि सुखावला
मूळ धरुनि पाताळीं जों न पोसला
चंडबळें खेळुं नको धरुनिया करां.

दृष्टीची साथ फिटुनि ती न निवळली
झिळमिळती सृष्टि बघुनि तींत रंगली
तव उबाळ किरणांची भूक वाढली
दावि नच विराट रूप तरि प्रभाकरा.

तळमळिनें जळत हृदय कांच तापली
सहजपणें ती नच जों शांत जाहली
वरदजळें क्षाळि न ती जरि विटाळली
ती ढळेल कायमची होउनी चुरा.

सौख्याची परिसीमा जरि तुझी दया
दुर्बल मी तींत न मज ये रमावया
वितळुं नको व्यर्थ प्रीतिच्या हिमाल्या
माझा नच योग अजुनि जाहला पुरा.

नारवें, ५-३-३४.

## वेड

[ जाति—बांसरी. भैरवी. ]

वेढ लाविलें असें कशास ना कळे उरीं
ये यशाविना प्रकाश हांसरा मदंतरीं
मृगजळास मोहुनी
मी मलूल धांवुनी
ये न तें करीं तरीहि गोड ओढ संगरीं
जें फुलांत शोधिलें
जें मनीं चितारिलें
तें न चुंबिल तरीहि रंग गंध हे घरीं
येइ चांदणें धरूं
अंबरांत ये फिरूं
स्वर्ग येइ भोगितां जरीहि प्राण पंजरीं
वाट पाहुनी तुझी
शीण लोचनांबुजीं
दर्शना मुकें तरीहि हुर्हुरींत माधुरी
लोचनीं जरी सडे
ऊन हें उरीं पडे
खेळ श्रावणा ! असा अनंतकाल अंतरीं

बोरी, १७–५–३१.

---

## वैभव

दीस गिमाचे बरंच सुकलं विहिरीमधलं जळ
धरूं लागलं नुक्तं कोठं रुखावळीला फळ
मृदु भारानं सखू बावली नाजुक परि जाहली
डोईवरती घागर घेउनि उन्हांत त्या चालली
दीड पुरुष त्या नितळ तांबड्या घरच्या भिंती बघून
तिला वाटलं काळोखांतिल गुपीत आलं फुलून
पारे होता अजून चढवित शिदू तिचा घरधनी
मिरगा आधीं झांकुन घ्यायचं होतं त्याच्या मनीं
किर्णावाणी तिला वाटली तवां शिदूची नुरा
घामें न्हाला देह तयाचा मशिंग आला भरा
परसांतिल पनवेलीपर ती हिरव्या वेषें खुलून
अलगद चालीं व्हाळावरच्या येई करव्यावरून
"जपून ये हं" शिदू म्हणाला "करवा नाहीं धड"
"तुमच्या पिर्तीच्या आधारं येणं नाहीं जड"
पुरे अतां हें किती राबणं ये दिस माथ्यावर—
पणसाखालीं बसून संगं जेऊं वाटीभर
तोर आणलं खळांतलं मी मागुन धनिणीकडून
तुमच्यासाठीं तसं आणिलं चुलींत खारं पुरून."
पसा दो पसे तुझ्या हातचं उदक घोटितां सखू
मला वाटतं उमेदिनं ही सर्व धर्तरी-जिखू
सोबत असतां तुझी साजणी जिकिर उन्हाची कुणा?
तुझ्या चिंतनीं कष्ट जुमानित नाहीं माझा कणा"
—जेवण झालं झाल्या गोष्टी अंथरिली वाकळ

झुरके वसला घेत शिदू तैं सावलींत शीतळ
पहात होती त्यास सखूही कातरीत पोफळ
पिर्तित त्यांना बाधत नव्हती संसाराची झळ !
मशिंगामुळें पानवेल कुणि झाली म्हणती जुन
वेलीवरवीं बाधेना त्या वैशाखींचें उन.

बोरी, १४–४–३४.

# मालवणारी वात

[ वृत्त–बासरी. ]

विश्व हें दिसे मला क्षणोक्षणीं नवें नवें
साथ तूं दिल्याविना न मुक्तकंठ गाववे
इष्टमित्रमीलनीं
भाषणीं विनोदनीं
रंगतांक्षणीं तुझी मनोज्ञ मूर्ति आठवे.
गोड जें जनीं वनीं
खेदजन्य जें मनीं
वाटतें अपूर्ण तें न भोगितां तुझ्यासवें.
आमुच्यांत सुंदरी
घातली जनें दरी
आणि त्यांजला हवें प्रकाशगीत गे नवें !
नीरवीं, भवाटवीं
वैभवीं नि गौरवीं
विश्रमीं, श्रमीं, भ्रमीं तुझी उणीव जाणवे.
काव्यदेविच्या वनीं
गंधमद्य प्राशुनी
जीव धुंद हो जरी तुझ्याविना न पालवे.
चेंचती मनोगतें
आणि तोंच वाटतें
तूं न सारिल्यामुळेंच आंत वात मालवे.

बोरी, ८–५–१९३२

# रे फुलेंच जड गमती हृदया

[ जाति—नववधू. ]

किति नवल तुला सांगूं सखया ?
रे फुलेंच जड गमती हृदया !

अमर कवींच्या उज्वळ वचनीं
भावार्थाचीं माझ्या लेणीं
दिसतां मन हर्षे श्रीमंतुनि
परि सुखीं दुखावे या समया.

विक्रमवंत चरित्रें वाचुनि
स्वाभिमान ये मनीं उसळुनी
लावुनि टांचणि तोंच आंत कुणि
मज म्हणे " गत तुझ्या पहा वया. "

फलद्रूप पाहुनी स्वसत्कृति
हृदयाचे जों डोळे निवती
तों काळाची विराट मूर्ती
मुख वासुनि घाली घोर भया.

अन्य देशिचीं विभवविलसितें
पाहुनि परिसुनि मानस रमतें
तोंच उणे सलुनी तें पुसतें
" अदृष्ट कधीं येइल उदया ? "

आणि कधिं कधीं ध्येयासाठीं

लढतां लढतां जिवलग तुटती
सुखा येइ वैराग्यें दीप्ती
तरि नित्य ज्योत जाळी हृदया.

क्वचितचि असले येति अमर क्षण
सालंकृत करिती हें जीवन
समाधान वाटे आलोकुन
ज्योतीच्या पोटीं घन छाया.

पणजी, १९३४.

---

# हिरकणी

[ छंद—ओवी ]

दिली मला हिरकणी
तुवां एकान्ताच्या पारीं

चोरी मला ठेवायाची
परी जगाच्या बाजारीं

अंधारल्या आसमन्तीं
कुढला जो जीव माझा

तिच्या तेजा देखुनीया
निमिषार्धें झाला ताजा.

दोन गुंज नाहीं सोनें
चंद्रमौळी झोंपडींत

विश्वमोलाचें हें रत्न
जडवाया कोंदणांत.

तुझी दौलतही थोर
सुरक्षित ठेवायाला

स्थळ उरावीण माझ्या
नाहीं आलें गे वांट्याला.

नाहीं तुला, नाहीं मला
जीव कावरे बावरे—

नशिबाची, जीविताची
दोरी गडे थरथरे.

## जीवन-संगीत

तुझ्या माझ्या डोळां आतां
यइ दाटूनिया रडें

सोसवेना तिची माया!
पोटीं तुटतें आंतडें.

हिरकणी देउनीया
तूं या लोकीं नागवली

घेउनीया माझी वेळा
मीच जवळ आणिली.

चोरी, २४-८-३५.

# तुझ्या तेजें

[ वृत्त—वसंत ]

जगाच्या आत्मयज्ञींच्या सदासाक्षी प्रकाशेंद्रा
कधीं माझ्या मनाची तूं जरी का फाडिली निद्रा
जिवाचीं बद्ध या स्वप्नें तुझ्या स्पर्शें खुलीं झालीं
तुझ्या तेजें जरी त्यांना प्रभावी चेतना आली
जिवीं जीं कोंडलीं विश्वें तयांना लाभली मुक्ती
घटीं विस्तारली माझी जरी ऐंद्रीय आसक्ती
तुझ्या तेजापरी माझ्या स्वरांचे भर्जरी धागे
जरी जीवांत गुंतोनी जहाले ते स्वयें जागे
करीं, नेत्रीं, उरीं, ओठीं तुझ्या लावण्य-तेजानें
भविष्यां नीं नवीं द्वी जरी सामावलीं पानें
प्रसादाचें तुझ्या फूल निखाऱ्याचेंच मागेन
चुली थंड्या अनेकांच्या कराया दीप्त लागेन
जयांनीं खोदिल्या नाहीं मनींच्या आंतल्या खाणी
निवांतीं प्राशिलें नाहीं जिवींचें जांभळें पाणी
जयांना ना कळे कैसें जगीं सौंदर्य चोखावें
घरीं, दारीं, सुखीं, दुःखीं, विरागीं काव्य भोगावें
जयांच्या आत्मबीजांत प्रभावी झोंपले वृक्ष
तयां देईन हुंगाया तुला ठेवूनिया साक्ष.

बोरी, १०–३–३४

# आकांक्षा

[ छंद—ओवी ]

जरी पुन्हा यावयाचें सत्य सुंदर या जगीं
प्राजक्तीच्या जाती जावें निसर्गाच्या नवयुगीं
माझ्या कोवळ्या पानांचें तुज बांधीन मंदिर
तुझ्या स्वर्णकिरणांची मज लाभतां झालर.
आशारूप ही सावली पोटीं सदा सांठवीन
कीं तूं माझ्या रसीं जावें हळुहळू मिसळून.
आणि यावी हुडहुडी पानीं भरावी सळसळ
ध्वनीमुळें पांथनेत्रीं ओघळावें गंगाजळ.
पोटीं एक लाट यावी मज हंसें नावरावें
तुझ्या स्वप्नवृत्तीनांही त्यांत पूर्णत्व मिळावें.
तुझें रूप गंध त्यांत मनोमन उमटावें
जेणें काळाचेंहि तीर क्षण भिजोनिया जावें.
ऐसा पडावा कीं सडा कीं तो करितांना गोळा
ओठीं अरुण फुलावा मनीं तारकांचा मळा.
उरीं ऐशा आनंदाची मूस सांठतां पेटती
शिरीं ढग वादळले तरी नाहीं मुळीं खंती.
तुझी लागुनी लहर गेला जरी हा बहर
सावधानचित्त करीं विनवणी ही लाचार.

पणजी, २८–७–३२

## —स

[ जाति—चंद्रकांत. ]

शरदृतूचें ऊन सांडलें होतें मन-रानीं
फूलपांखरापरि तूं आलिस रंगाची राणी
स्तिमितपणांतचि विरलीं माझीं उच्छृंखल गाणीं
नकळत नयनीं आलें व्याकुळ कसलेंसें पाणी
आणि वाटलें जिवा, पांखरा ! उडतच बिलगावें
सलगीनें तव सार्थक सगळ्या वृत्तींचें व्हावें.
तुझ्या दर्शनें प्रथमच गमलें मी आहें दुःखी
जिवलग जग हें सदैव पुढती होइल आशंकी.
असुख असें हें गोड निर्मिलें अंतर्मुख केलें
वज्र मनींचें संस्कारांनीं दुखवुनि उजळविलें.
असह्य झालें तेज तयाचें या दुबळ्या जीवा
जरी तयानें वैभव चढलें विस्मृत मम नांवा
अदृढ असल्या सुखद क्षणाला आलिस तूं अदये
न मागितां तूं मागितलें जें मीही देउं नये.
आज राहिला एकच जरि मज गहिरा अंधार
सतेज त्याचीं स्वप्नें मजला होती आधार.

पणजी, ६–११–३५.

# प्रमादाचा पिंगा

[ छंद—प्रमाद. ]

अगडबंबं बंबं भयाण नाद । भयाण नाद
पिसाट नंगा नाचे प्रमाद.

दीर्घ किंकाळीनें घेइ काळजाचा घास
खाऱ्या घामाचा हो त्याच्या त्रिलोकाला वास.
तोंडांतून ज्वाला त्याच्या येती नऊलाख
सर्वांगाला जिवांचिया संसाराची राख.
नाचतांना गरगरां फिरवितो डोळे
उकळतें वाटे तेथें काळकूट काळें.
तेंच पसरुनी वाटे आकाश पाताळ
कोळपून काजळून गेलें तिन्ही काळ.
जटा त्याच्या आपटती मोडती कीं माड
सागराचा घोष किंवा भयानक गाढ.
कर्णीं त्याच्या घोंघावती वाळे आणि माशा
काळा देह वाटे जणूं मृत्युचा तमाशा.
दांत विचकवी, चावी, फेंदारितो नाक
अंगुलीनें फिरवितो लोखंडाचें चाक.
अर्भकांच्या आंतड्याच्या गळां त्याच्या माळा
लाज झांकावया मोहरांचा सोनसळा.
चूड हातीं जाळावया आघवें ब्रह्मांड
तेलथाळी दुज्यांत वा मुकें हें कुभांड.

काहीं करीं दुर्बळांच्या नशिबांचे टाळ
क्षणीं रडे क्षणीं हांसे अकाळविकाळ.
पोट बडवीत म्हणे “ नरमांस आणा
नाहींतरी प्रळय मी करीन हें जाणा ”
राजे घेउनिया आले कळसे रक्ताचे
बावा घेउनिया उभे ग्रासही मेंदूंचे.
वनें उपवनें आतां लागलीं पेटाया
आसनें नी सिंहासनें लागलीं मोडाया.
नैवेद्याची आतां पुढें उरली ना सोय
क्रुद्ध प्रमाद हा नाच भुका थय्‌थय्‌.
आपुलेंच खाई आतां तोडोनिया मांस
रक्तबिंदूंतून येती दानवांचे वंश.
राजा ! त्यांना खावयाला देशील रे काय ?
उमराव अमीरांची व्यर्थ आतां धाय !
तुझ्या त्याच्या संहरणा राजा ! स्वयमेव—
गण घेउनिया आले शंभु महादेव.

कळंगूट, ११—४—३६.

# प्रसादाची वाट

[ छंद–अभंग. ]

धाड देवा ऐशा संकटांच्या कोटी
होवो ताटातुटी दांभिकांची.

कळतील कोण सोयरे सज्जन
तुझी प्रेमखूण बाणूनिया.

संकटांची सुरी लागतां जिव्हारीं
अमृताची झरी पोटीं झरे.

कळे मज जीवीं कोठें तुझा वास
वाटती सायास निर्माल्यें गा.

वार घेतां वाटे दिव्य हें शरीर
तुझेंच मंदिर अनंता रे.

करितों मी तेथें भावें झाडलोट
प्रसादाची वाट पहातसें.

बोरी, ८–५–३४.

# माझ्या हिऱ्यास

[ जाति–नववधू. ]

'रे हिऱ्या माझिया झळक वरीं !
रे झळक शिरीं ! तूं झळक उरीं !'
हांस गड्या चल उधळ प्रकाशा
चलाचलीं हिरवळीत आशा
फुलोत शीघ्र मुक्यांच्या भाषा
रंगुनी गंधुनी भुवनभरी.
मानवतेच्या नयनीं, अधरीं
करीं, शिरीं, उरिं, उदरीं, जठरीं
हंसत झुळझुळो अष्टौप्रहरीं
रे तव तेजाची विमल झरी.
हलाहलांतुनि निघेल अमृत
जागृत होइल जीवन विस्मृत
श्रेय अगोचर होइल आवृत
पसरली चराचरभर लहरी.
करूं घरोघर अशी दिवाळी
दिव्य जोंवरी अपुल्या भाळीं
हरूं जगाची सकळ काजळी
स्मित हरिचें जोंवर या शरिरीं

कळंगूट, १७–४–३६.

## निरोप

[ जाति-हरिभगिनी राग.-जोगी. ]

प्रीति तुझी राहिल स्मरणीं
जन्मजन्म मज जाळित उजळिल दिव्य ज्योति जी तव नयनीं
अश्रुजलें तव जाइल वितळुनि किल्मिष आमिष जें स्वमनीं
दाहक मोहक निश्वासांचीं दिधलिंस सुमनें सुरतरुणी
तेणें आला देवपणा मज पार्थिवता सगळी गळुनी.
तव दुःखांच्या शिणगारांनीं नटलें तनमन दिनरजनीं
प्रकाशभापा एक उरे त्या रतण्या तव अद्वयभजनीं
साक्षात्कारचि तुझ्या प्रीतिचा होय गमे मज प्रतिकिरणीं
सत्य करुनि सौंदर्यसाज जणुं ज्वलित स्मितें उधळी भुवनीं.
त्यागचि माझा भोग देवते ! घाव न कधिं आणिन मरुनी
आजीवन वाहवुनी शोणित मांगल्यें न्हाणिन अवनी

म्हापसें, २३-२-३६

# किति दयाघना करितोस ऋणी ?

[ जाति—नववधू. ]

किति दयाघना करितोस ऋणी
असा सुखाचा पाउस पाडुनि ?
पथीं लाभती स्मितें निशिदिनीं
इंद्रजाल मनिं प्रतिपलिं भ्रमणीं
भंवतीं नंदनवनसम अवनी
आकंठ शर्कराजलहि जनीं.
तरंग शीतल असे सखे जन
अरुणकिरणवृंदसा मित्रगण
फुलवि दरवळवि ज्याचें भाषण
रसरसे हृदय वर्णी गहनीं.
अनंतपथिं कुणि सावरिती मज
कथिती भावें अंतरिचें गुज
वाजवुनी प्रीतीचें अलगुज
घालविती जीवाची झुरणी.
फुलें घरीं, दारीं, व्यवहारीं
मधु परि मम हृन्मशकागारीं
आंच लागतां जळजळणारी
किति गोडी भरिसी तरि ज्वलनीं ?
चढतां गिरि मी, क्षितिज फुलविसी
हंसतां गंधें त्रिभुवन भरिसी
जळतां मी तूं स्नेह घालिसी
पसरिसि जीवन अगणित किरणीं.

वोरी, १२–४–२४

# माझे अश्रू !

[ छंद–ओवी ]

नभीं मेघ काळा काळा कुणासाठीं अश्रू ढाळी
आणि काजळी तयाची तयांसवें कोण गाळी ?
कोण त्वरें करी त्याला ज्योतिर्मय निरंजन
अश्रूंतून कोण त्याच्या ओपी वनांत जीवन ?

कुणासाठीं शिंपल्याचें कातरतें अंतरंग
कोण तयासवें भरी मनीं त्याच्या सांध्य रंग ?
कोण वेदनांचीं त्याच्या करी दिव्य मुक्ताफळें
जगीं कौतुक तयांचें कोण करवी आगळें ?

कुणासाठीं कोळशाला भूमिगर्भी जळजळ
केविं लाभतें तयाला तेज स्वर्गीचे सोज्ज्वळ ?
घणासवें येती केवीं लोळ द्युतीचे त्यांतून
कोठें दुःख अमोल जें करी जडा सचेतन ?

कुणासाठीं नेत्र माझे येती जळून भरून
सुखासुखीं जीव माझा कुणासाठीं उदासीन ?
माझ्या मात्र आसवांचें व्हावें काय क्षार पाणी
दाहें त्यांच्या काजळावें जग काय करपोनी ?

कळंगूट, १७–४–३६.

## माझ्या गीतांस—

[ जाति—चंद्रकांत ]

निळावतीच्या दीपकळ्यांनो आलां माझ्या घरीं
नाचुनि गाउनि रंगविली ही मम अंगण ओसरी.
मुशाफरीला चला जिवांनो विसरा आतां मला
चिंवचिंव ऐकुनि चिमण्यांची ये दाटुनि माझा गळा.
दाणे टिपितां त्यांना बघुनी ओठीं आणिन हंसूं
आणि आठवुनि तुमच्या लीला पिउनी घेइन असूं.

मुंबई, १०–३–३६.

— समाप्त —

दा. क्र. ५७६६

# ' जीवन-संगीतां 'त आलेल्या कोंकणी शब्दांचे अर्थ.

| पृ. | शब्द | अर्थ |
|---|---|---|
| ४ | चिरा | बांधकामाचा दगड. |
| ८ | संगम—उत्सव | दोन होड्या जोडून त्यांवरून काढलेली उत्सवमूर्तीची रात्रीची मिरवणूक. |
| १२ | पोफळी; पोफळ (न.) | सुपारीचें झाड; ओली सुपारी. |
| ,, | वझरा | उंचावरून पडणारा जलप्रवाह |
| ,, | पोवली | पोफळीच्या पानापासून तयार केलेला मोठा द्रोण. |
| ,, | तिखट कढी | एक प्रकारची आमटी |
| ,, | रेन्देर | निरा काढणारा |
| ,, | चुडत | माडाचें पान |
| ,, | कुळागर | पोफळींचें वन |
| १४ | चौपाशी | चौसोपी |
| १५ | अडसर | किंचित् जून शहाळें |
| १७ | भिरीं | पक्ष्यांचे थवे |
| ,, | नूर | दिवा; सतेज चेहरा |
| १८ | वळकांडीं | वळणें |
| १८ | जिवजिवार | जीवजिवाणूं |
| ,, | दवरणें | ओझीं ठेवण्यासाठीं रस्त्याच्या बाजूला केलेला चौथरा. |
| २० | रुखावळ | वृक्षराजी |
| ,, | तार | नदी ओलांडण्यासाठीं ठेवलेली होडी |
| २३ | कळंजणें | काळें पडणें |
| ,, | तणारा | खोपट |

| पृ. | शब्द | अर्थ |
|---|---|---|
| २४ | मांडा | कोंकणी जानपद गीताचा एक प्रकार |
| ,, | सूर | माडी |
| ३० | किंवाटा | आवेग |
| ३६ | मांडावळ | रचना |
| ४८ | चानिया (ए. व. चानी) | खारी |
| ४८ | पिसोळीं (ए. व. पिसोळें) | फुलपांखरें |
| ४८ | शीर | लांवट तुकडा |
| ४९ | विळी | लहानसा विळा |
| ५४ | गब्रे | केळीचीं सोलपटें. |
| ६४ | साय | पापुद्रा. |
| ६६ | वावली | मल्लल झाली. |
| ६६ | किर्णावाणी | पाण्यांत पडलेल्या सूर्यविंबासारखी. |
| ६६ | तुरा | तोंडवळा. |
| ६६ | मशिंग | शेवग्याचें झाड. |
| ६६ | व्हाळ | ओढा. |
| ६६ | करवा | माडाच्या खोडाचा तुकडा. |
| ६६ | तोर | कोवळें आम्रफळ. |
| ६६ | खळ | मीठ-मिरची घातलेलें पाणी. |
| ६६ | खारं | सुकी मासळी. |

REFBK-0005766

REFBK-0005766